दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१६५ | शुक्रवार दि.०४ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## अंतरवलीत शासकीय शिष्टमंडळ दाखल; उपोषण सुटण्याची शक्यता

जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज सहावा दिवस आहे. राज्यभरातून या आंदोलनाला वाढता पाठिंबा मिळत असताना, राज्य सरकारच्या वतीने एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या चर्चेतून सकारात्मक संकेत मिळाले असून लवकरच यावर तोडगा निघण्याची आणि उपोषण मागे घेतले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शासनाच्या वतीने मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत, मंत्री मकरंद पाटील आणि आमदार प्रसाद लाड यांनी अंतरवली सराटीत प्रत्यक्ष उपस्थित राहून मनोज जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधला. मागण्यांवर थेट विचारविनिमय: शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांच्या मागण्या आणि आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत सरकारची भूमिका त्यांच्यासमोर मांडली. सकारात्मक प्रतिसाद: उभय ◀◀ पान २ वर

# कोल्हापुरात शक्तिपीठ महामार्गावरुन संघर्ष

## क्षीरसागर आणि शेट्टी समर्थक आमने- सामने, कार्यकर्त्यांची धरपकड

कोल्हापूर । प्रतिनिधी

**कोल्हापुरात शक्तिपीठ महामार्गावरुन संघर्ष कायम आहे. गुरूवारी (दि. ३ सप्टेंबर) येथील शिवाजी चौक परिसरात शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार राजेश क्षीरसागर आणि शेतकरी नेते राजू शेट्टी यांचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली. दोन्ही गटांमध्ये जोरदार घोषणाबाजी आणि शाब्दिक वाद पाहायला मिळाला. यावेळी पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दोन्ही गटातील कार्यकर्त्यांची धरपकड केली.**




शक्तिपीठ महामार्गाविरोधात राजू शेट्टी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. जमीन मोजणीसाठी अधिकाऱ्यांना शेतात पाय ठेवू देऊ नका, असे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले आहे. त्यावर आमदार क्षीरसागर यांनी, सरकारने मनावर घेतले तर तुम्हाला टांगून ठेवेल असा इशारा दिला होता. त्यांच्या या वक्तव्याच्या निषेधार्थ सांगलीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी क्षीरसागरांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले. त्यावर क्षीरसागराच्या समर्थकांनी राजू शेट्टींच्या प्रतिकात्मक प्रतिमेला जोडो मारत आंदोलन केले होते. त्याच्याविरोधात आज प्रति आंदोलन स्वाभिमानी शेतकरी संघटना तसेच शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी केले. यामुळे संघर्ष टोकाला पोहोचला. कुठल्याही परिस्थितीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना धडा ◀◀ पान २ वर

### शक्तिपीठ महामार्गामुळे शेतकरी देशोधडीला...

आम्ही शक्तिपीठ महामार्गाला विरोध करत असताना राजेश क्षीरसागर यात उतरलेले आहेत. तुम्ही शक्तिपीठ महामार्गाचे समर्थन करत आहात. पण एवढे लक्षात ठेवा की यामुळे राज्यातील शेतकरी देशोधडीला लागला आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्याने व्यक्त केली.

# अजितदादांच्या जाण्याचे राजकारण नको!

## दादांची आई, मुले आणि माझ्याएवढे मोठे दु:ख कोणाचे असू शकत नाही-सुनेत्रा पवार


पुणे । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण होऊ नये असे म्हटले आहे. दादांच्या आई, मुले आणि माझ्या एवढे मोठे दु:ख कुणाचेच असू शकत नाही, असेही सुनेत्रा पवार यांनी म्हटले. माझा तपास यंत्रणांवर विश्वास आहे. आम्ही देखील दादांच्या अपघाताची चौकशीची मागणी करतो आहोत, फक्त ते मीडियासमोरच केली पाहिजे असे काही नाही, असे त्यांनी म्हटले. खासदार सुप्रिया सुळे यांनी एक वक्तव्य केले होते, त्याबाबत विचारले असता सुनेत्रा पवार यांनी आपली भूमिका मांडली.**

खरे सांगायचे तर आदरणीय अजितदादा गेल्याचे सगळ्या महाराष्ट्राबरोबर, जी पोकळी निर्माण झाली आहे ती आणि आकाश कोसळले



आहे ते माझ्या आणि माझ्या मुलांपेक्षा कोणाला जास्त माहिती असणार? मला असे वाटते दादांच्या या घटनेवर सगळ्यांचा काहीतरी आम्हाला निर्णय कळला पाहिजे. आम्ही देखील त्यादृष्टीने प्रयत्नच करत आहोत, असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. आम्ही आदरणीय पंतप्रधान साहेबांना, आदरणीय गृहमंत्र्यांना भेटून आलो आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे. आपल्या आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात शब्द दिलेला आहे. तो शब्द ते पाळण्यासाठी कळ्ड सोशीने प्रयत्न करत आहेत. नक्कीच तपास यंत्रणा सुद्धा आपले काम करत आहेत. माझा तपास यंत्रणांवर, कायदा आणि संविधानाने निर्माण केलेल्या ◀◀ पान २ वर



## सिंधू नदीचे पाणी रोखल्याने पाकिस्तानात हाहाकार

दिल्ली । वृत्तसंस्था

रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, ही भारतीय पंतप्रधानांची घोषणा आता पाकिस्तानसाठी सर्वात मोठा धक्का ठरली आहे. भारताने सिंधू नदीचे पाणी रोखल्यानंतर पाकिस्तानात पाण्यासाठी तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या परिस्थितीत पाकिस्तान सरकारकडे आता केवळ कोर्ट ऑफ आर्बिट्रेशनच्या निर्णयाचा कागद उरला आहे, ज्याला भारताने आधीच बेकायदेशीर ◀◀ पान २ वर

# नवनीत राणा यांची अटक वैधच

## मुंबई पोलिसांचा मुंबई उच्च न्यायालयात दावा

मुंबई । प्रतिनिधी

हनुमान चालीसा पठण प्रकरणी माजी खासदार नवनीत राणा यांना करण्यात आलेली अटक पूर्णपणे कायदेशीर आणि वैध असल्याचा दावा मुंबई पोलिसांनी मुंबई उच्च न्यायालयात केला आहे. या प्रकरणी विस्तृत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले असून, पुढील सुनावणी आता २३ सप्टेंबर रोजी होणार आहे.

२०२२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री




निवासस्थानाबाहेर हनुमान चालीसा पठण करण्याच्या घोषणा तत्कालिन खासदार आणि भाजप नेत्या नवनीत राणा तसेच त्यांचे पती आमदार रवी राणा यांनी केली होती. या प्रकरणावरून खार पोलिसांनी नवनीत राणा यांना ◀◀ पान २ वर

# मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा बीडमध्ये बाजारपेठ बंद, मराठा आंदोलकांची रॅली

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली. या पार्श्वभूमीवर गुरुवारी सकाळपासून बीड शहरातील व्यापारी बांधवांनी बंदमध्ये सहभाग नोंदविला. दरम्यान शहरामध्ये मराठा आंदोलकांनी दूचाकी फेरी काढून बंदमध्ये





सहभागी होण्याचे आवाहन करत आंदोलन शांततेत करण्याचे आवाहन केले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले आहे. मात्र राज्य शासनाकडून त्यांच्या आदोलनाची दखल घेतली जात नाही. ◀◀ पान २ वर

# जालन्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा

## ८ हजार कोटींच्या गुंतवणुकीची घोषणा, ड्राय पोर्टमुळे राष्ट्रीय बाजारपेठेशी जोडणीची क्षमता अधोरेखित

जालना प्रतिनिधी

जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने जालना जिल्हा प्रशासन आणि जालना फर्स्ट सिटिझन फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या औद्योगिक शिखर परिषदेला उद्योजक, गुंतवणूकदार, प्रशासकीय अधिकारी आणि विविध




उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी परिषदेला जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष गौरव दयाल, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंग कुशवाह, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, गोविंद गोयल, रितेश मिश्रा, धवल मिश्रिकोटकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी ◀◀ पान २ वर

# नळदुर्ग किल्ल्यावरून आईने मुलांसह उचलले टोकाचे पाऊल; माय-लेकाचा करुण अंत

धाराशिव । प्रतिनिधी

जिल्ह्यातील नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यावरून एका आईने आपल्या तीन चिमुकल्या मुलांसह उडी मारली असून, या दुर्दैवी घटनेत आई आणि एका मुलाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर दोन लहान मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात ◀◀ पान २ वर



# आता सण-उत्सवातील अन्न एफडीएच्या रडारवर

## तुकाराम मुंढेंनी काढले नवे आदेश, महाप्रसादाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष तपासणी होणार

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात सण आणि उत्सवांच्या काळात मिळणारा महाप्रसाद, लंगर अथवा भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता एफडीएच्या रडारवर असून, एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सण-उत्सवांच्या काळात होणारी अन्नातील भेसळ रोखण्यासाठी स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स हा निर्णय जाहीर केला आहे. यानुसार, महाप्रसादाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष तपासणी केली जाणार आहे. भारताच्या इतिहासात सर्व धर्मीयांच्या सणांसाठी वर्षभराचा असा**



**स्थायी आदेश काढण्याची ही पहिलीच वेळ आहे.**

यानुसार सणांच्या काळात मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा आणि मटण-चिकनची मागणी अनेक पटींनी वाढते, त्यामुळे भेसळीची शक्यताही दाट असते. हे रोखण्यासाठी एफडीएने वर्षभराचे कॅलेंडर तयार केले असून सर्व सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण केले आहे. यानुसार, कारवाईची प्रक्रिया ही सणाच्या २१ दिवस आधी सुरू होऊन सण संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत सुरू राहणार आहे. ही मोहीम एकूण चार टप्प्यांत राबवली जाईल. पहिला टप्प्यात हाय-रिस्क अन्नाचे नकाशांकन, विशेष पथकांची नियुक्ती आणि प्रयोगशाळांना पूर्वसूचना दिली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात, ◀◀ पान २ वर

### सर्व सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण

१) प्रथम श्रेणी (राज्यव्यापी सण) गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ (ख्रिसमस) आणि नववर्ष पूर्वसंध्या. २) द्वितीय श्रेणी (प्रादेशिक सण) मकर संक्रांती, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी व कार्तिक वारी, श्रावण मास, जन्माष्टमी, दहीहंडी, कोजागिरी आणि गुरुनानक जयंती. ३) तृतीय श्रेणी (स्थानिक सण ) जत्रा, पालखी सोहळा आणि उरुस.

## विद्यापीठांतील प्राध्यापक भरतीला पुन्हा 'ब्रेक'?



पुणे । प्रतिनिधी

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये अनेक वर्षांनी होत असलेली प्राध्यापक भरतीची प्रक्रिया डिसेंबरपर्यंत पूर्ण होण्याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. प्राध्यापक भरती प्रक्रियेविरोधात उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल झाली असून, आता पदभरती आणखी लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### विद्यानंद बापटांना पोलिसांकडून संरक्षण

पुणे : डीजे आणि ध्वनीप्रदूषणाच्या मुद्द्यावरून चर्चेत आलेले सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्याची पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे. बापट यांची तक्रार नोंदवून घेण्यात आली असून, या प्रकरणातील आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. आरोपीची पोलीस कोठडी मिळावी, यासाठी न्यायालयाकडे मागणी करण्यात येणार असल्याची माहिती पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, "या घटनेकडे पोलिसांनी गांभीर्याने पाहिले आहे. दोषींवर कडक कारवाई करण्याची पोलिसांची भूमिका आहे." बापट यांना पोलिसांकडून सुरक्षा पुरवण्यात आली असून, पुढील आदेशापर्यंत परिस्थितीनुसार त्यांना सुरक्षा दिली जाणार आहे. या घटनेनंतर पुण्यातील विविध गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी पोलिसांनी चर्चा केली. सर्व गणेश मंडळांनी या घटनेचा एकमताने निषेध केला असून, भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नये यासाठी मंडळांसोबत चर्चा करण्यात आली आहे, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

### फडणवीसांना उपपंतप्रधानपद! -राऊत

मुंबई: संजय राऊत म्हणाले की, मोदींच्या मंत्रिमंडळात त्यांचा वारसदार म्हणून ज्या व्यक्तीची निवड होईल, त्यांनाच उपपंतप्रधानपद दिले जाण्याची चर्चा आहे. संघाची भूमिका लवकरच समोर येईल. ती व्यक्ती सध्या दिल्लीत नसून देवेंद्र फडणवीस यांना ही मोठी जबाबदारी दिली जाऊ शकते, एवढी माहिती माझ्याकडे आहे. संजय राऊत म्हणाले की, आपल्या देशाचा इतिहास पाहिला तर गृहमंत्री राहिलेली कोणतीही व्यक्ती पंतप्रधान झालेली नाही. अमित शहा यांना पंतप्रधान होण्याची तीव्र इच्छा आहे, पण ते शक्य होणार नाही. जर मंत्रिमंडळात फेरबदल करायचे असतील तर आधी अमित शहा यांचा राजीनामा घ्या, मगच आम्ही राजीनामा देऊ, असा इशारा काही वरिष्ठ मंत्र्यांनी थेट पंतप्रधानांना दिला आहे. अन्यथा तुम्ही आम्हाला बाजूला काढा असे संघाच्या जवळील काही मंत्र्यांनी मोदींना सांगितले आहे. राम मंदिराला सीईओ देत त्यांचा व्यापार करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून सुरू आहे. जेडीपीचा आकडा फुगवत देशातील जनतेला फसवले जात आहे. पंतप्रधान मोदींनी देशातील नागरिकांना मोफत रेशन आणि महिलांना पैसे देण्याची सवय लावत देशाचा जीडीपी कसा वाढेल असा सवाल राऊत यांनी केला आहे.

### कोळसा खरेदीचे टेंडर रद्द करा-नाना पटोले

मुंबई : भाजपा सरकार जनतेला दररोज महागाईचा शॉक देत आहे. साखरेपासून सर्वच्या वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. सर्वात जास्त महागाई महाराष्ट्रात आहे आणि आता वीज दरवाढीचा शॉक देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. वीज निर्मितीसाठी लागणाऱ्या कोळशासाठी महाजनकोने ३० लाख मेट्रीक टन कोळसा खरेदीचे टेंडर काढले असून, हा कोळसा मोदी-शाह यांच्या मित्रोंच्या खाणीतून घेतला जाणार आहे. हा महागडा कोळसा खरेदी केल्यास वीजेचे दरही वाढतील, त्यामुळे हे टेंडरच रद्द करा, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, आम्ही मागील आठवड्यात कोळशाचा मुद्दा उपस्थित केला होता आता सरकारने आणखी एक टेंडर काढले आहे. ३० लाख मेट्रीक टन कोळशाचे हे टेंडर आहे. आपण डब्लूसीएलकडून चांगल्या प्रतीचा व कमी दरातील कोळसा खरेदी करत होतो, हाच कोळसा गुजरात व कर्नाटकला सुद्धा जातो पण पंतप्रधानांच्या मित्रांना फायदा पोहचवण्यासाठी हे टेंडर काढले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २८.५० क्विंटल | २,६२६ | २,८०० | २,६९४ |
| ज्वारी/हायब्रिड : ९६.५० क्विंटल | २,३०१ | ३,९०५ | ३,१३६ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : २३.५० क्विंटल | ८,२५० | ८,२५० | ८,२५० |
| बाजरी: २२.०० क्विंटल | २,४५२ | २,७८६ | २,६२५ |
| मुग: ८.५० क्विंटल | ७,७९० | ८,७०१ | ८,२४५ |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,१०० | ६,९०० | ६,००० |

## अग्रलेख

# फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री की हिंदी राजभाषेचे महाराष्ट्रातील सूत्रधार?

महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि तिच्या वेशीवरची नवी मुंबई. गणेशोत्सवाचा पहिला दिवस. आणि याच दिवशी केंद्र सरकारचे 'हिंदी दिवस' तसेच सहावे अखिल भारतीय राजभाषा संमेलन.! १४ आणि १५ सप्टेंबरला वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात होणाऱ्या या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित राहणार असल्याचे अधिकृत राजभाषा विभागाच्या नोंदीत स्पष्ट आहे. देशभरातून अधिकारी, साहित्यिक आणि प्रतिनिधी या कार्यक्रमासाठी येणार आहेत. केंद्र सरकारला हिंदीचा प्रचार करायचा आहे, त्यासाठी राजभाषा संमेलन घ्यायचे आहे, याला घटनात्मक आणि प्रशासकीय चौकट आहे. त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही. पण मुंबईच्या वेशीवर, गणेशोत्सवाच्या प्रारंभी आणि सध्याच्या मराठी–अमराठी वादाच्या पार्श्वभूमीवरच या कार्यक्रमाची निवड का? हा प्रश्न विचारला तर तो हिंदीविरोध ठरत नाही. तो महाराष्ट्राच्या राजकीय संवेदनशीलतेचा प्रश्न ठरतो. आणि या प्रश्नाच्या केंद्रस्थानी आहेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

फडणवीस सरकार एकीकडे मराठीला महाराष्ट्राची राज्यभाषा म्हणून प्रतिष्ठा देण्याची भाषा करते. दुसरीकडे मुंबईतील अमराठी रिक्षा–टॅक्सी चालकांना मराठी शिकण्याची अट लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी पुढे ढकलते. २७ ऑगस्टला फडणवीस यांनी अशा चालकांना मराठी शिकण्यासाठी आणखी एक वर्षाची मुदत दिली. आता त्याच सरकारच्या काळात मुंबईच्या दारात हिंदीच्या राजभाषा संमेलनासाठी केंद्राला भव्य व्यासपीठ उपलब्ध होते. याहून मोठा राजकीय विरोधाभास कोणता? पण गोष्ट इथेच थांबत नाही. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठीची हिंदी भाषा परीक्षा रद्द केली. शासनानेच स्पष्ट केले की महाराष्ट्रात मराठी ही शासकीय कामकाजाची भाषा आहे आणि सध्याच्या प्रशासनात हिंदीचा वापर अत्यंत नगण्य आहे. हा निर्णय ७ मे २०२६ पासून लागू करण्यात आला आहे. म्हणजे एका बाजूला महाराष्ट्र सरकार म्हणते, हिंदीची सरकारी कर्मचाऱ्यांसाठी परीक्षा आता आवश्यक नाही. दुसऱ्या बाजूला मुंबईच्या वेशीवर केंद्र सरकार हिंदी राजभाषेचे राष्ट्रीय संमेलन भरवत आहे. मग नेमकी दिशा कोणती? मराठीला प्राधान्य की हिंदीला राजकीय अवकाश? सरकारने याचे उत्तर द्यावे. हिंदी ही भारतीय भाषांपैकी एक महत्त्वाची भाषा आहे. तिचा द्वेष करण्याचे कारण नाही. महाराष्ट्राने हिंदी भाषिक नागरिकांना स्वीकारले आहे, रोजगार दिला आहे, उद्योग दिले आहेत, सांस्कृतिक व्यासपीठ दिले आहे. त्यामुळे हा प्रश्न 'हिंदी विरुद्ध मराठी' असा करून महाराष्ट्राला पुन्हा भाषिक संघर्षाच्या खाईत ढकलणे चुकीचे ठरेल. पण हिंदीचा सन्मान आणि मराठीचे राजकीय दुय्यमीकरण यात जमीन–अस्मानाचा फरक आहे. मुंबई बहुभाषिक आहे; पण तिची प्रशासकीय आणि प्रादेशिक ओळख महाराष्ट्राशी जोडलेली आहे. मुंबईत गुजराती, हिंदी, उर्दू, इंग्रजी, दक्षिण भारतीय आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या असंख्य भाषिक समुदायांनी आपापली ओळख जपली. हीच मुंबईची ताकद आहे. परंतु बहुभाषिकता म्हणजे स्थानिक भाषेचे विस्थापन नव्हे. मग प्रश्न असा मराठीचा सन्मान राखून हिंदीचे संमेलन मुंबईत घेणे शक्य नव्हते का? नक्कीच शक्य होते. मग त्यासाठी गणेशोत्सवाचा पहिला दिवसच का? राजकारणात वेळ, ठिकाण आणि प्रतीक यांना महत्त्व असते. त्यामुळे या कार्यक्रमाच्या वेळेबद्दल प्रश्न विचारले जाणे स्वाभाविक आहे. विशेषतः मुंबईत रिक्षा–टॅक्सी चालकांच्या भाषेचा प्रश्न तापलेला असताना आणि मराठी–अमराठी वादाला राजकीय रंग चढलेला असताना हा कार्यक्रम अधिक संवेदनशील ठरतो. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर कायदा–सुव्यवस्थेचीही विशेष तयारी सुरू असल्याचे वृत्त आहे. फडणवीस सरकारने म्हणूनच स्वतःला एक साधा प्रश्न विचारला पाहिजे, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून तुमची पहिली राजकीय जबाबदारी महाराष्ट्राच्या भाषिक–सांस्कृतिक संवेदनशीलतेची आहे की, केंद्राच्या प्रत्येक राजकीय–सांस्कृतिक उपक्रमाला महाराष्ट्रात निर्विघ्न व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची? केंद्र आणि राज्य यांच्यात संघर्ष असावा, असे कुणी म्हणत नाही. पण संघराज्यव्यवस्थेत राज्य सरकारचे स्वतःचे सांस्कृतिक आणि भाषिक भान असते. महाराष्ट्राच्या राज्यभाषेचा प्रश्न हा केवळ भावनेचा विषय नाही; तो राज्याच्या प्रशासनिक ओळखीचाही विषय आहे. फडणवीस सरकारला जर खरोखर मराठीला सर्वोच्च स्थान द्यायचे असेल, तर त्याची कसोटी फक्त विधानसभेतील भाषणांमध्ये किंवा घोषणांमध्ये होऊ शकत नाही. कसोटी निर्णयांच्या सातत्याची असते.

सरकारी कर्मचाऱ्यांची हिंदी परीक्षा रद्द करणे हा मराठीच्या प्रशासनिक स्थानाला बळ देणारा निर्णय आहे. रिक्षा–टॅक्सी चालकांना मराठी शिकण्याची मुदतवाढ देणे हा वेगळा संदेश देतो. आणि त्याच वेळी मुंबईच्या वेशीवर हिंदीचे राष्ट्रीय राजभाषा संमेलन आयोजित होत असेल तर जनतेला प्रश्न पडणारच. हा प्रश्न फडणवीस सरकारने टाळू नये. कारण महाराष्ट्राला हिंदीशी युद्ध नको आहे. महाराष्ट्राला कोणत्याही भारतीय भाषेशी वैर नाही. पण महाराष्ट्राच्या राजधानीत मराठीला राजकीयदृष्ट्या दुय्यम भासवणारे कोणतेही समीकरण महाराष्ट्र स्वीकारणार नाही. फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे दिल्लीच्या राजभाषा धोरणाचे प्रतिनिधी असण्यापेक्षा महाराष्ट्राच्या भाषिक अस्मितेचे संवैधानिक संरक्षक म्हणून त्यांची भूमिका अधिक स्पष्ट दिसली पाहिजे. हिंदीचे संमेलन मुंबईत होत आहे म्हणून मराठी संपणार नाही. पण मराठीच्या नावाने सत्ता मिळवून, सत्तेत आल्यानंतर मराठीच्या संवेदनशील प्रश्नांवर संदिग्ध भूमिका घेतली गेली, तर जनतेचा प्रश्न अधिक बोचरा असेल''फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत तरी नेमके महाराष्ट्रासाठी, की हिंदी राजभाषेच्या विस्तारासाठी महाराष्ट्राचे राजकीय सूत्रधार?'' या प्रश्नाचे उत्तर घोषणा देऊन नव्हे, तर कृतीतून द्यावे लागेल. कारण भाषा केवळ शब्द नसते. भाषा म्हणजे ओळख, इतिहास आणि आत्मसन्मान असतो आणि महाराष्ट्राच्या बाबतीत त्या आत्मसन्मानाचे नावमराठी.!

# राज्यातील १४ जिल्ह्यांत पावसाचा अंदाज

## विदर्भ आणि घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात पावसाची उघडीप कायम असली तरी काही ठिकाणी पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी हजेरी लावत आहेत. परंतु या सरी सर्वदूर नाहीत. सध्या मध्य प्रदेशात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे विदर्भात पावसाला पोषक स्थिती निर्माण झाली आहे. विदर्भ मराठवाडा, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि घाटमाथ्यावर पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे.

पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथा, अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांत काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. तर वर्धा, यवतमाळ, वाशिम,बुलढाणा, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांसह पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर नंदुरबार, धुळे, नाशिक, अहिल्यानगर, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज दिला आहे. तर उर्वरित राज्यात मात्र ऊन–सावल्यांच्या खेळात तुरळक ठिकाणी पावसाची भूरभूर हजेरी लावण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. तर शुक्रवारपासून पुन्हा राज्यातील बहुतांश भागात उघडीप कायम राहण्याचा अंदाज आहे. गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि धुळे जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांसह पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर नंदुरबार, नाशिक, सांगली, सोलापूर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, परभणी जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या सरीचा अंदाज असून उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी ऊन सावल्यांच्या खेळात पावसाची भूरभूर हजेरी लावण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. सध्या मॉन्सून कमकुवत असल्याने पावसाचा अंदाज असला तरी सर्वदूर जोरदार सरी बरसण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे खरीप पिकांनाही फटका बसत आहेत. तर शेतकरी पावसाची प्रतीक्षा करत आहेत. ईशान्य मध्य प्रदेश आणि परिसरातील ठळक कमी दाबाचे क्षेत्र त्याच भागात कायम आहे. या प्रणालीशी संबंधित चक्राकार वाऱ्यांची स्थिती समुद्रसपाटीपासून ७.६ किलोमीटर उंचीपर्यंत विस्तारली आहे. हे ठळक कमी दाबाचे क्षेत्र पुढील २४ तासांत दक्षिण उत्तर प्रदेश आणि लगतच्या उत्तर मध्य प्रदेशातून पश्चिम–वायव्य दिशेने सरकण्याची शक्यता आहे. सध्या मॉन्सूनचा आस श्रीगंगानगर, रोहतक, फतेहगड, ईशान्य मध्य प्रदेशातील ठळक कमी दाबाच्या क्षेत्राच्या केंद्रातून डाल्टनगंज, दिघा आणि त्यानंतर आग्नेय दिशेने ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत विस्तारला आहे. तसेच ईशान्य अरबी समुद्र आणि लगतच्या सौराष्ट्रावरील चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीपासून ठळक कमी दाबाच्या क्षेत्राशी संबंधित चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीपर्यंत एक कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय असून ते दक्षिण गुजरात आणि पश्चिम मध्य प्रदेशातून समुद्रसपाटीपासून ३.१ ते ४.५ किलोमीटर उंचीवर कायम आहे.

# मोलाटोनीन हार्मोनच्या असंतुलनामुळे वाढल्या निद्रानाशाच्या तक्रारी- डॉ.जगदीश टेकाळे

## आहार–विहाराचा परिणाम;महिलांमध्ये अपुऱ्या झोपेमुळे मधुमेह,उच्चरक्तदाबासह हृदयविकाराचा धोका बळावतोय

**बीड । प्रतिनिधी**

मानवी शरीरात निसर्गतः एक जैविक घड्याळ असते. ते दिवस–रात्रीच्या चक्राशी जोडले असल्याने रात्री गाढ झोप मिळवून देणारे मेलाटोनीन है हार्मोन मेंदू रात्रीच्या वेळी तयार करतो. मात्र आहार–विहाराच्या सवयींबरोबरच या जैविक घड्याळाचे कामकाज कोलमडल्याने मेलाटोनीनचे असंतुलन होत असून अनेकांना निद्रानाशाची समस्या उद्भवत आहे. विशेषतः महिलांमध्ये अपुऱ्या झोपेमुळे मधुमेह, उच्चरक्तदाबासह हृदयविकाराचा धोका बळावत आहे.मेलाटोनीन हा एक नैसर्गिक संप्रेरक असून ते मेंदूतील पिनियल ग्रंथीद्वारे तयार होते. हे संप्रेरक शरीराला अंधारात झोपण्याची वेळ झाल्याची जाणीव करुन देते व झोपेचे चक्र नियंत्रित करते. बदलत्या राहणीमानात स्मार्ट फोन, लॅपटॉप या दैनंदिन वापराच्या गोष्टी बनल्या आहेत. त्यामुळे मोबाईल, लॅपटॉप स्क्रीनचा अतिवापर, उशिरापर्यंत उजेडात राहणे किंवा काम करण्यामुळे मेलाटोनीन तयार



होण्याचे प्रमाण कमी होते. मेलाटोनिन असंतुलनाने मेंदूला झोपण्याचे योग्य संकेत मिळत नाहीत. परिणामी झोप न लागणे, अपुरी झोप मिळणे यांसारख्या निद्रानाशाच्या समस्या निर्माण होतात. निद्रानाशामुळे शरीराचे जैविक घड्याळही कोलमडून अपचन, पित्त यांसह आरोग्य विविध तक्रारी भेडसावत आहेत. उच्च स्वत्तदाब, मधुमेहासारखे आजार बळावून आरोग्यविषयक गुंतागुंत वाढत आहे. चिडचिडेपणा, निरुत्साहामुळे मानसिक स्थास्थ्यही हिरावत आहे.मोबाईल, टीव्ही आणि संगणकाचा वापर, दिवसा सूर्यप्रकाश कमी मिळणे, रात्री उशिरापर्यंत जागरण, शिफ्ट ड्युटी/रात्रीची नोकरी, मेलाटोनिन सप्लिमेंटचा अनियंत्रित वापर शरीराबरोबरच मन व मेंदूलाही स्वास्थ्य आवश्यक आहे. त्यासाठी कमीत कमी ७ तास झोप आवश्यक आहे. सध्याच्या जीवनशैलीमुळे सर्वच वयोगटात निद्रानाशाची समस्या उद्भवत असली तरी मोनोपॉज व हामोन्सच्या असंतुलनामुळे तो महिलांमध्ये अधिक जावणतो, रात्रीचा आहार कमी घ्यावा, नियमित ३० मिनिटे चालण्याचा व्यायाम तसेच हृदय, मेंदू व शरीराच्या सर्व अवयवांना आवश्यक फास्ट वॉकिंगचा व्यायाम आठवड्यातून किमान ५ दिवस करणे आवश्यक आहे. काही जण झोप येण्यासाठी मेलाटोनीनच्या गोळ्या वापरतात दीर्घकालीन निद्रानाशाने ग्रस्त प्रौढांमध्ये एक वर्ष किंवा त्याहून्?? अधिक काळ मेलाटोनीनच्या सेवनाने हृदयविकाराचा झटका तसेच मृत्यूचाही धोका वाढतो. झोपण्याच्या किमान एक ते दोन तास आधी मोबाईल किंवा टीव्ही स्क्रीनपासून लांब राहावे, रात्री उशिरापर्यंतचे जागरण टाळावे, दररोज एकंच वेळ झोपण्याची व उठण्याची सवय ठेवावी. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# गणेशोत्सव अवघ्या दहा दिवसांवर; गणेशमूर्तींच्या रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात

## यंदाच्या गणेशोत्सवाला महागाईची झळ; बाप्पाच्या मूर्तींचे दर वाढणार, भक्तांच्या खिशाला कात्री

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या आणि उत्साहात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला अवघे दहा दिवस शिल्लक राहिल्याने युसूफवडगाव परिसरातील गणेशमूर्तिकारांची लगबग वाढली आहे. गणेशमूर्तींच्या निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सध्या मूर्तींना आकर्षक रंग देणे, रंगरंगोटी, नक्षीकाम व सजावटीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.**

गणेशोत्सव जवळ येताच बाप्पाच्या आगमनासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. घरगुती गणपतींसह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मूर्तींनाही मागणी वाढू लागली आहे. त्यामुळे मूर्तिकारांकडून दिवस–रात्र मेहनत घेऊन मूर्तींना अंतिम रूप दिले जात आहे. मात्र, यंदाच्या गणेशोत्सवावर महागाईचे सावट दिसून येत आहे. गणेशमूर्ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाल्याने मूर्तिकारांचा उत्पादन खर्च वाढला आहे. त्यात रंग, सजावटीचे साहित्य, मजुरी तसेच वाहतूक खर्चही वाढल्याने यंदा गणेशमूर्तींच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. गणेशमूर्तींच्या किमती वाढल्याचा थेट परिणाम सर्वसामान्य गणेशभक्तांच्या खिशावर होणार आहे. दरवर्षी श्रद्धेने आणि उत्साहाने घरी बाप्पाची प्रतिष्ठापना करणाऱ्या भाविकांना यंदा मूर्तीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आनंदासोबतच वाढलेल्या खर्चाचे गणितही भक्तांना सांभाळावे लागणार आहे. एकीकडे महागाईचा वाढता आलेख आणि दुसरीकडे बाप्पाच्या स्वागताचा कायम असलेला उत्साह, अशा दुहेरी परिस्थितीत यंदाचा गणेशोत्सव साजरा होणार आहे. महागाई कितीही वाढली तरी बाप्पाच्या स्वागतातील भक्तिभाव आणि उत्साह कमी होणार नाही यात मात्र किंचित ही शंका नाही.




## पान १ वरून...

### अंतरवलीत शासकीय शिष्टमंडळ

पक्षांमध्ये दीर्घकाळ चाललेल्या बैठकीत अनेक मुद्द्यांवर सहमती दर्शवण्यात आली आहे. तोडग्याची शक्यता: चर्चेनंतर उपोषण सोडवण्यासाठी शिष्टमंडळाने केलेल्या आवाहनाला अनुकूल वातावरण निर्माण झाले असून, लवकरच निर्णय होण्याची चिन्हे आहेत. सलग सहा दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणामुळे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीबाबत राज्यभरातील मराठा समाजात चिंता व्यक्त केली जात आहे. आंदोलनाच्या समर्थनार्थ विविध जिल्ह्यांत निदर्शने आणि मोर्चे सुरू आहेत. आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने शिष्टमंडळाला थेट मैदानात उतरवले. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना शिष्टमंडळातील नेत्यांनी चर्चा अत्यंत सकारात्मक झाल्याचे स्पष्ट केले. सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिले असून, मनोज जरांगे पाटील आंदोलक सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून पुढील अधिकृत निर्णय जाहीर करणार आहेत.

------------

### कोल्हापुरात शक्तिपीठ

शिकवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देत शिवसेनेचे कार्यकर्ते आज कोल्हापुरातील शिवाजी चौकाच्या समोर दाखल आले. याचदरम्यान शेट्टींच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलन सुरु होते. यामुळे दोन्ही गट आमने–सामने आल्याने तणाव निर्माण झाला. वाहतूक ठप्प झाली. यावेळी पोलिसांनी कडक पोलिस बंदोबस्त होता. त्यांनी कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. पोलिसांनी दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांची धरपकड करत त्यांना ताब्यात घेतले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.

-------------

### सिंधू नदीचे पाणी रोखल्याने

आणि अमान्य घोषित केले आहे. पाकिस्तानच्या सीमापार दहशतवादी कारवायांना उत्तर म्हणून भारताने जेव्हा १९६० चा सिंधू पाणी करार स्थगित केला, तेव्हा शहबाझ शरीफ सरकारची मोठी कोंडी झाली. पाकिस्तानने नेदरलँड्स येथील न्यायालयात भारताची तक्रार केली होती. न्यायालयाने १९६० चा करार लागू ठेवण्याचे आदेश दिले असले तरी, भारताने स्पष्ट केले आहे की भारत या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मानत नाही. त्यामुळे हा निकाल भारतासाठी केवळ कागदाचा तुकडा आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयात भारताने उपस्थित राहण्यास आणि निकाल मानण्यास नकार दिल्यानंतर पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने यावर तीव्र विरोध दर्शवला आहे. ६० वर्षे जुना हा जलवाटप करार कायदेशीररीत्या बंधनकारक असून कोणताही देश एकतर्फी निर्णय घेऊ शकत नाही, असा दावा इस्लामाबादने केला आहे. पाकिस्तानने शांघाय सहकार्य संघटनेच्या व्यासपीठावरही हा मुद्दा उपस्थित केला, मात्र भारताने आपली भूमिका ठाम ठेवली आहे. नवी दिल्लीने सिंधू पाणी करार पूर्णपणे स्थगित ठेवला आहे. पाकिस्तानने जोपर्यंत सीमापार दहशतवाद कायमस्वरूपी आणि पडताळणीयोग्य पद्धतीने थांबवला जात नाही, तोपर्यंत या करारावर पुनर्विचार केला जाणार नाही, अशी भारताची अट आहे. तसेच, हेग येथील स्थायी लवाद न्यायालयाची स्थापना करारातील मूळ नियमांचे उल्लंघन करून झाली आहे, त्यामुळे त्याचे कोणतेही अंतरिम आदेश भारताच्या सार्वभौम धोरणांवर लागू होत नाहीत.

----------

### अजितदादांच्या जाण्याचे

गोष्टींवर विश्वास आहे. मला असे वाटते की त्यांना आपण वेळ दिला पाहिजे. सतत मीडियामध्ये येणे म्हणजे अपडेट मिळणे असे नाही, असे सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले. मला असे वाटते की, वारंवार अशा गोष्टी करुन मीडिया ट्रायल होते की काय असे वाटते. खरेतर आपल्या सर्वांनी विचार केला पाहिजे. दादांची आई, दादांची मुले आणि मी याच्यापेक्षा त्याचे दु:ख कोणाला होणार आहे. त्याच्यामुळे त्यांच्या सगळ्या गोष्टींची लवकरात लवकर चौकशी व्हावी हे आम्हाला देखील वाटते, आम्ही तसे प्रयत्न करत आहोत. त्यामुळे असे समजण्याचे कारण नाही की आम्हाला काही होत नाही किवा काही नाही. मला एवऐच वाटते की, आपण तपास यंत्रणेला वेळ दिला पाहिजे. त्यांच्यावर माझा विश्वास आहे, असे सुनेत्रा पवार यांनी म्हटले. तुम्हाला माहिती आहे की अशा प्रकारच्या गोष्टी परत परत मीडियामध्ये होतात. दादांच्या जाण्याचे अशा प्रकारचे राजकारण कोणीच करु नये असे मला वाटते, असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. दरम्यान, अमित ठाकरेंनी फोटो हटवल्याने तुम्ही एफआयआर केला, माझा भाऊ गमावला, माझा भाऊ त्यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री होते, त्यांचा एवढा मोठा अपघात होता, त्यांचा मृत्यू झाला, त्याचा आजपर्यंत एफआयआर झाला का? अजित पवार त्यांच्याच सरकारमध्ये होते, त्यांचे सरकार आहे, अजित पवार यांचे ४० आमदार आजही त्यांच्याच सरकारमध्ये आहेत. मी माझ्या भावासाठी न्याय मागत आहे. अमित ठाकरेंवर केस होत असेल तर माझ्या भावाला न्याय कधी मिळणार असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विचारला होता.

---------

### मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा

परिणामी त्यांच्या आंदोलनाला पांठिबा देण्यासाठी बीड जिल्ह्यामध्ये समाज बांधवांनी बीड जिल्हा बंदची हाक दिली होती. त्या हाकेला साथा देत बीड शहरासह जिल्हाभरातील व्यापारी, शाळा, महाविद्यालयासह अनेकांनी स्वयंस्फुर्तीने बंदमध्ये सहभाग नोंदवला. बीड बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यासाठी मराठा आंदोलकांनी शहरात रॅली काढली. ही रॅली शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा येथून सुरू झाली. शहरातील प्रमुख मार्गावरुन ही दूचाकी रॅली फिरवण्यात आली. याची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौक पुतळा शिवतीर्थ या ठिकाणी झाली. आंदोलकांनी नागरिक आणि व्यापाऱ्यांना शांततेत बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. शहरातील मुक्ताई मार्गावरील मुख्य बाजारपेठेतील अनेक दुकाने बंद ठेवण्यात आली. मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी व्यापाऱ्यांनी बंदमध्ये सहभाग घेतल्याचे चित्र दिसून आले.

---------------

### नवनीत राणा यांची

ताब्यात घेऊन अटक केली होती. पोलिसांच्या या अटकेच्या कायदेशीरतेला आव्हान देणारी याचिका नवनीत राणा यांच्या वतीने उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर शुक्रवारी न्यायालयात सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान मुंबई पोलिसांनी अटकेचे समर्थन करत ती कायदेशीर प्रक्रियेला धरूनच असल्याचा युक्तिवाद केला. न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या एकलपीठाने हा आदेश दिला. भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम १५३ (अ) (धार्मिक किंवा सामाजिक तेढ निर्माण करणे) अंतर्गत दाखल झालेला एफआयआर नक्की कधी नोंदवला गेला, याची तारीख आणि वेळ राज्य सरकारने प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करावे. विशेष न्यायालयाने २०२४ मध्ये राणा दांपत्याचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला होता. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या पुनरीक्षण याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने विचारले की, राणा दांम्पत्याने खरोखरच मातोश्री बंगल्याला वेढा घातला होता का किंवा तिथे जाऊन हनुमान चालीसा पठण केले होते का? यावर वकील मर्चंट यांनी नाही असे उत्तर दिले. न्यायमूर्तींनी दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर, एफआयआर नोंदवण्याच्या वेळेबाबतची खरी स्थिती स्पष्ट करण्यासाठी राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले. या प्रकरणी भूमिका मांडण्यासाठी २३ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून, पुढील सुनावणी २३ सप्टेंबर रोजी होणार आहे.

---------------

### नळदुर्ग किल्ल्यावरून आईने मुलांसह

खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, आत्महत्या करणारी महिला ही धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील वंताळा गावची रहिवासी असल्याचे समोर आले आहे. त्या माऊलीने पोटच्या तीन लहान लेकरांसह किल्ल्यासारख्या उंचावरून उडी मारून इतके टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. घरगुती वाद किंवा अन्य काही कारण आहे का, याचा सखोल तपास नळदुर्ग पोलीस करत आहेत. माय–लेकाच्या अशा दुर्दैवी अंतामुळे शोककळा पसरली असून, दोन गंभीर जखमी चिमुकल्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना केली जात आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने मदतकार्य राबवून जखमी चिमुकल्यांना बाहेर काढले. गंभीर जखमी झालेल्या दोन्ही मुलींवर पुढील तातडीच्या उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले.

------------

### जालन्याच्या औद्योगिक विकासाला

अशिमा मित्तल यांनी जालना जिल्हा गुंतवणूकदारांसमोर केवळ योजनाच नव्हे, तर प्रत्यक्ष उपलब्ध सुविधांसह उभा असल्याचे सांगितले. ड्राय पोर्ट कार्यान्वित असून कनेक्टिव्हिटी वाढत आहे. परिषदेत पहिल्या गुंतवणुकीच्या बांधिलकीही मांडण्यात आल्या आहेत. जालन्याची निवड करणाऱ्या उद्योगांना जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. परिषदेत विविध औद्योगिक विषयांवर चर्चासत्रे झाली. महिकोने कृषी–नाविन्य आणि जालन्याच्या बियाणे उद्योगातील क्षमता मांडली. एलजीबीचे व्यवस्थापकीय संचालक पी. प्रभाकरन यांनी जालना हे उदयोन्मुख गुंतवणूक केंद्र असल्याचे नमूद केले. एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंग कुशवाह यांनी उपलब्ध जमीन, औद्योगिक प्रोत्साहने आणि व्यवसाय सुलभतेची माहिती दिली. विकास ग्रुपने मल्टी–मॉडल लॉजिस्टिक्स पार्क (एमएमएलपी) आणि जालन्याच्या लॉजिस्टिक्स क्षमतेवर प्रकाश टाकला. उद्योजक राम भोगले आणि जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल यांनी जालन्याला राष्ट्रीय बंदरांशी जोडणाऱ्या एक्झीम व्यापाराच्या शक्यता स्पष्ट केल्या. 'जालना गुंतवणूक दृष्टिकोन' या विषयावरील पॅनल चर्चेत लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे कार्यकारी संचालक मधुर गुप्ता, भाग्यलक्ष्मी ग्रुपचे संचालक नितिन काबरा, लघु उद्योग भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रवींद्र वाडिया, ऑल इंडिया वाइन प्रोड्यूसर्स असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश होळकर, एंड्यूरन्स टेक्नॉलॉजीजचे अध्यक्ष संजय संघई आणि इंडियन ऑयल कॉर्पोरेशनचे महाव्यवस्थापक संदीप कोहली सहभागी झाले. दुसऱ्या पॅनल चर्चेत एमएमएलपी आणि जालन्याच्या लॉजिस्टिक्स क्षमतेवर चर्चा झाली. टोयोटा किर्लोस्कर मोटारचे महाव्यवस्थापक (बाह्य संबंध) रवी सोनटक्के, वन एडीसी इंडस्ट्रियल पार्क डेव्हलपर्सचे व्यवस्थापकीय संचालक अमित दामोदर चुघ, विकास कोल अँड मिनरल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रजत राव, बजाज ऑटोचे वरिष्ठ व्यवस्थापक सुधीर कामथ आणि गरवारे पॉलिएस्टरचे वरिष्ठ महाव्यवस्थापक (वाणिज्य) जयकुमार नायर यांनी सहभाग घेतला. दोन्ही चर्चासत्रांनंतर प्रश्नोत्तरांचे आयोजन करण्यात आले. परिषदेत लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडने महत्त्वपूर्ण गुंतवणुकीची घोषणा केली. कंपनीकडून नजीकच्या काळात सुमारे २ हजार कोटी रुपये, तर दीर्घकालीन कालावधीत ६ हजार कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक करण्याचे जाहीर करण्यात आले. या गुंतवणुकीमुळे जालना जिल्ह्यातील औद्योगिक विस्ताराला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. इंडियन ऑयल कॉर्पोरेशनने विनोदराय इंजिनियरिंग आणि रूट पाइप्स यांच्यासोबत गॅस पुरवठ्यासंदर्भात सामंजस्य करार केला. तसेच एंड्यूरन्स टेक्नॉलॉजीज आणि बजाजसह अनेक मूळ उपकरण उत्पादकांनी जालन्यात स्थानिक व्हेंडर विकसित करण्याबाबत सहमती दर्शविली. त्यामुळे ऑटोमोबाईल आणि पूरक उद्योगांतील स्थानिक एमएसएमईसाठी भविष्यात नव्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. औद्योगिक विकासासाठी एमआयडीसीकडून सेवायुक्त भूखंडांचे 'प्लग–अँड–प्ले' मॉडेल, एमएसएमईसाठी २० टक्के आरक्षण तसेच गुंतवणूकदारांना तातडीने उद्योग सुरू करता यावा यासाठी प्रशासकीय सहकार्य देण्याची ग्वाही देण्यात आली. 'एक जिल्हा, एक उत्पादन' उपक्रमांतर्गत जालना हे टीएमटी सळई उत्पादनाचे महत्त्वाचे केंद्र असून देशातील प्रमुख बियाणे उत्पादक जिल्ह्यांपैकी एक असल्याचेही परिषदेत अधोरेखित करण्यात आले.

**विकासासाठी शासनाकडे चार प्रमुख मागण्या**

जिल्ह्याच्या भविष्यातील विकासासाठी शासनाकडे चार प्रमुख मागण्या परिषदेत मांडण्यात आल्या. यामध्ये ड्राय पोर्टला शेंद्रा–बिडकीन मार्गिकेशी जोडणारा रस्ता, जालना–छत्रपती संभाजीनगर शटल रेल्वे, नवीन एमआयडीसी टप्प्यासाठी जमीन उपलब्ध करून देणे आणि सिडकोच्या नेतृत्वाखाली नियोजित नागरी विकास यांचा समावेश आहे. एमएमएलपी आणि ड्राय पोर्टमुळे जालना तसेच संपूर्ण मराठवाड्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याची क्षमता निर्माण होणार असल्याचे परिषदेत स्पष्ट करण्यात आले. जालना हे राष्ट्रीय बंदर जाळ्याशी जोडले जाऊन एक्झीम व्यापारासाठी महत्त्वाचे प्रवेशद्वार बनू शकते, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजनाने झाली. गोविंद गोयल यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

----------

### विद्यापीठांतील प्राध्यापक

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये रिक्त असलेल्या सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक या पदांच्या भरतीस मान्यता दिली होती. गुणवत्तापूर्ण उमेदवारांची निवड होण्यासाठी या पदभरतीमध्ये नव्या निकषांचा समावेश करण्यात आला. त्यानुसार शैक्षणिक संशोधन आणि अध्यापनातील कामगिरी, मुलाखत, अशी विभागणी करण्यात आली. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने या पदभरती प्रक्रियेत शैक्षणिक संशोधन अध्यापनासाठी ८०, मुलाखतीसाठी २० गुण असे सूत्र निश्चित केले होते. त्यावर विविध संघटनांनी आक्षेप घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांनुसार भरती प्रक्रिया राबविण्याची मागणी करण्यात आल्यानंतर बदल करून ७५–२५चे सूत्र जाहीर करण्यात आले. त्यावरही आक्षेप नोंदविण्यात आल्याने पुन्हा बदल करून ६०–४० चे सूत्र निश्चित करण्यात आले. त्यानुसार विद्यापीठांकडे दाखल झालेल्या अर्जांची छाननी, पात्रता पडताळणी करून आता मुलाखती सुरू झाल्या आहेत. त्यामुळे बऱ्याच वर्षांनी विद्यापीठातील पदभरती प्रक्रिया मार्गी लागत असतानाच या प्रक्रियेविरोधात नुकतीच उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांतील सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक या पदांसाठीच्या मुलाखती जवळपास पूर्ण झाल्या आहेत. सहाय्यक प्राध्यापकपदासाठी उमेदवारांची संख्या जास्त असल्याने या मुलाखती जास्त काळ चालणार आहेत. मात्र, न्यायालयात दाखल याचिकेवर भरतीचे भवितव्य अवलंबून असून, भरती प्रक्रिया डिसेंबरपर्यंत पूर्ण होण्याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

-----------

### आता सण–उत्सवातील अन्न

गिरण्या, घाऊक मंड्या आणि वाहतुकीवर लक्ष, पहाटेच्या वेळी विशेष नाका तपासणी केली जाणार आहे. तिसर्या टप्प्यात सणाच्या दिवशी विशेष भरारी पथकांद्वारे प्रत्यक्ष ठिकाणांची सरप्राईज तपासणी केली जाणार आहे. तसेच, चौथ्या टप्प्यात दोषींवर खटले दाखल करणे आणि अहवाल आयुक्तांकडे सादर करणे यांचा समावेश आहे. ई–कॉमर्स, आयात अन्नपदार्थ, बेकरी आणि पॅकबंद पाणी या सर्वांवर एफडीएची कडक नजर असणार आहे. झिरो टॉलरन्स धोरण राबवले जात आहे. सण संपल्यानंतर १४ दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दोषींवर न्यायालयात खटले दाखल केले जातील. हा स्थायी आदेश पूर्ण वर्षासाठी लागू राहणार आहे.

---------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि.०४ सप्टेंबर २०२६


## थोडक्यात

### सिद्धेश्वर गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी सुनील नावडकर

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील शेळके गल्ली येथील सिद्धेश्वर गणेश मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळाच्या वतीने विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.



मंडळाच्या अध्यक्षपदी सुनील नावडकर, उपाध्यक्षपदी प्रताप पवार, सचिवपदी मेघराज नावडकर, कोषाध्यक्षपदी करण जाधव, तर लेझीम प्रमुखपदी शिवाजी पवार यांची निवड करण्यात आली.

मंडळाचे मार्गदर्शक व सल्लागार म्हणून शिवाजी नावडकर, गोविंद इतापे, श्रीराम शेळके, गणेश शेळके, सोमनाथ बावणे, पांडुरंग इतापे, अंगद रोमन, नितीन शेळके यांच्यासह मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणेशोत्सव उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासोबतच सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी व्यक्त केला.

### धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सवात माऊली महाराज पठाडे यांची किर्तनसेवा

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड येथील ग्रामदैवत श्रीक्षेत्र धुनकेश्वर देवस्थान येथे गेल्या दहा वर्षांपासून भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवाचे यंदाही उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवातील चौथा श्रावण सोमवारी दि.७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत युवकवीर ह.भ.प.माऊली महाराज पठाडे यांची किर्तनसेवा आयोजित करण्यात आली आहे.



किर्तनसेवेनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन धुनकेश्वर श्रावण महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.धार्मिक वातावरणात होणाऱ्या या महोत्सवामुळे धुनकेश्वर देवस्थान परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण होते. महाराष्ट्रातील नामवंत मृदंगाचार्य ह.भ.प.भरत महाराज पठाडे यांच्या मृदंग वादनाने व सुप्रसिद्ध गायनाचार्य ह.भ.प. कैलास महाराज पवार व गायनाचार्य ह.भ.प. ओमकार महाराज जगताप यांच्या गायनाने मंत्रमुग्ध करणार आहेत.

या महाप्रसादाचे यजमान म्हणून विक्रम रघुनाथ करांडे,मोहन यदा नांदे,पारराम मारुती यादव,गिन्यानदेव हरिभाऊ गावडे,त्रिंबक म्हातारबा यादव,अर्जुन सदाशिव डोंगरे,विठ्ठल जानार्धन डोंगरे,भागवत शामराव धोंगडे,राहुल तात्याराम खेलबुडे,वैजनाथ मनोहर डोंगरे,नितिन सुदाम तोंडे,हनुमान शिवाजी करांडे,रत्नेश्वर सूर्यकांत सावंत,उत्तरेश्वर विश्वनाथ भोसले,दिनकर बाजीराव रोटे,विजय श्रीरंग गायकवाड,विष्णु बाबाराव यादव,तुकाराम दौला मुंडे,महादेव रामा काळे,चंद्रशेन बाजीराव रोटे,भारत नानाभाऊ सावंत,राहुल अशोक यादव,ज्ञानेश्वर बन्सी यादव,छत्रभुज दादाराव नाईकवाडे,महादेव रामभाऊ यादव, वैजनाथ बाबूराव नाईकवाडे,शिवनारायण संदिपान करांडे,हनुमान श्रीरंग बजगुडे,विलास गप्पु सत्त्वधर,अशोक सुखदेव यादव,सखाराम प्रभाकर मनेरी,रामचंद्र रघुनाथ कागणे,श्रीराम गणपती यादव,बाबुराव श्रीरंग तोंडे,कल्याणराव महादेव रोडे,नवनाथ लिंबा नांदे,बंडू रामभाऊ जाधव,महादेव भिवा नाईकवाडे,रामप्रसाद लिंबाजी बिल्पे,सुनिल दादाराव जाधव,रुस्तुम धोंडीबा सावंत,संतोष अर्जुनराव गुरसाळे,विष्णु दगडु नागरगोजे,ज्ञानोबा हारिभाऊ तोगे,संपती किसन मस्के,शिवाजी विठ्ठल यादव,नामदेव सखाराम गोमचाळे,राजेभाऊ गणपती साठे,भारत रावसाहेब कानाडे, मच्छिंद्र अशोक धुमाळ,मोहन राजेभाऊ नाईकवाडे,राहुल ओमप्रकाश यादव,अशोक बाबुराव डोंगरे यांच्यासह धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समिती व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.या धार्मिक सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# खाजगी हवामान अंदाजांवर शासनाने बंदी घालावी

## अंदाज चुकल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान-माजी आ. धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

चुकीचे हवामान अंदाज सांगून शेतकऱ्यांची दिशाभूल करणाऱ्या खाजगी व्यक्तींवर शासनाने बंदी आणावी, अशी मागणी माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली. अंदाजाच्या आधारावर शेतकरी खते व बियाणे खरेदी करून पेरणी करतात ; मात्र पाऊस न पडल्यास त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे हवामान अंदाज जाहीर करण्यासाठी सक्षम आणि तज्ज्ञ यंत्रणाच असावी,असे त्यांनी स्पष्ट केले.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील प्रा. डॉ. दत्तात्रय बोडखे आणि प्रा. डॉ. सुमन खेडकर यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून माजी आ. भीमराव धोंडे बोलत होते. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले, गेल्या काही वर्षांत विविध माध्यमांतून हवामान अंदाज सांगणाऱ्या खाजगी व्यक्तींची संख्या वाढली आहे. अनेक जण कोणत्याही अधिकृत हवामानविषयक ज्ञानाशिवाय अंदाज व्यक्त करतात. या अंदाजांवर विश्वास ठेवून शेतकरी शेतीचे नियोजन करतात. खते, बियाणे व इतर कृषी निविष्ठांवर खर्च करून पेरणी केली जाते; मात्र अंदाज चुकल्यास आणि अपेक्षित पाऊस न झाल्यास शेतकरी आर्थिक संकटात सापडतो.

शेतकऱ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या चुकीच्या आणि बेजबाबदार हवामान अंदाजांवर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. शासनाने अशा व्यक्तींवर बंदी आणून शासकीय पातळीवरील हवामान यंत्रणा अधिक सक्षम करावी. तज्ज्ञांच्या वैज्ञानिक अभ्यासावर आधारित आणि अधिकृत हवामान अंदाजच जनतेपर्यंत पोहोचविण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली. सेवानिवृत्तीनंतर शिक्षकांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देऊन नियमित व्यायाम आणि सकस आहाराला प्राधान्य द्यावे, असेही धोंडे यांनी सांगितले.



**चुकीच्या अंदाजाने आर्थिक फटका**

खाजगी हवामान अंदाजांवर विश्वास ठेवून शेतकरी खते व बियाणे खरेदी करून पेरणीचे नियोजन करतात. मात्र, अंदाजानुसार पाऊस न पडल्यास पेरणी वाया जाऊन शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसतो, असे भीमराव धोंडे यांनी सांगितले.

यावेळी चेअरमन राजेश धोंडे, बाबुलाल भंडारी, राजाबापू नलावडे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. संभू वाघुले, प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे, प्राचार्य डॉ. बापुराव धोंडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, महेश कारखान्याचे संचालक बजरंग कर्डीले, प्राचार्य डॉ. भगवान वाघुले, हभप निवृत्ती महाराज बोडखे, सरपंच भीमराव बोडखे, आंधळे महाराज, रविंद्र चौधरी, गणेश वाघमारे, चित्रसेन भवार, डॉ. शाम सांगळे, प्रा. डॉ. भाऊसाहेब काळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात भीमराव धोंडे यांच्या हस्ते प्रा. डॉ. दत्तात्रय बोडखे व प्रा. डॉ. सुमन खेडकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयाच्या २६ व्या 'शेतकरीयन' अंकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी प्रा. डॉ. दत्तात्रय बोडखे,प्रा. डॉ. सुमन खेडकर व इतरांची भाषणे झाली. महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास शिक्षक तसेच बोडखे व खेडकर यांचे नातेवाईक व स्नेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उपप्राचार्य डॉ बापु खैरे, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे, प्रा. डॉ. शैलजा कुचेकर यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. राम बोडखे यांनी मानले.

## दोन वेठबिगार गोशाळेतून मुक्त परंतु पाच जणांचा आणखीन शोध सुरू

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील टालेवाडी गावामध्ये सात कामगारांना दुसऱ्या जिल्ह्यातून आणून त्यांच्याकडून गत दोन महिन्यापासून जबरदस्तीने काम करून घेतल्या जात होते दिवसभरात १४ ते १५ तास त्यांच्याकडून काम करून घेऊन त्यांना मारहाणही केलं जायची त्यांना त्यांच्या घरी फोनही करू दिला जात नव्हते तसेच जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या एका दिवशी त्यांनी त्या गोशाळेतून पळून जाण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्याकडे मोबाईल नसल्यामुळे व बीड जिल्ह्यातील गावांची माहिती नसल्यामुळे परत त्यांना पकडून आणून मालकाने हाणमार केली ते खूप भीतीदायक वातावरणामध्ये राहत होते या सर्व प्रकाराची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड ला मिळाल्यानंतर अधिकार मित्र तत्त्वशील कांबळे यांनी विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड यांच्याशी संपर्क साधून यावेळी कामगारांना मुक्तता करण्यासाठी विशेष प्रयत्न केले . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित यंत्रणेला आदेश दिले व तात्काळ या कामगारांचे मुक्तता करावी असे निर्देश दिले तदनंतर वैभव महेंद्रकर तहसीलदार वडवणी विवेक




उडान नायब तहसीलदार वडवणी त्यांची टीम व जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे अधिकारमित्र तत्त्वशील कांबळे व ज्ञानोबा वायबसे यांनी एक तारखेला रात्री रेस्क्यू ऑपरेशनला राबवले त्यामध्ये दोन कामगार आढळून आले व बाकीचे कामगार अंधार असल्यामुळे व लाईट नसल्यामुळे तसेच त्या ठिकाणी मोबाईल टावर नसल्यामुळे शोधता आले नाहीत सदरील दुसऱ्या कामगारांना तेथील मालकाने दुसऱ्या ठिकाणी लपवून ठेवले तहसीलदार वडवणी यांनी वडवणी पोलीस यांना पोलीस प्रोटेक्शन ची मागणी करूनही त्यांना पोलिसांची सुरक्षा मिळाली नाही त्यामुळे स्वतः तहसीलदार सामाजिक कार्यकर्त्यांनी या कामगारांची सुटका केली सुटका केल्यानंतर मालकाच्या विरोधात वेठबिगारी कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला सदरील कामगारांना मारहाण झाल्यामुळे जिल्हा शासकीय रुग्णालय बीड येथे त्यांना दाखल करण्यात आले त्या ठिकाणी त्यांचा उपचार सुरू असून गौरव इंगोले उपविभागीय अधिकारी माजलगाव हे त्यांना सुटका प्रमाणपत्र देणार आहेत त्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी जिल्हा सरकारी कामगार अधिकारी कार्यालय बीड कडून विशेष प्रयत्न केले जाणार आहेत सदरील कार्यवाही दरम्यान नायब तहसीलदार यांच्यावर तेथील कुत्र्याने चावा घेण्याचा प्रयत्न केला परंतु ते थोडक्यात बचावले त्यांची पॅन्ट या हल्ल्यात फाटली व ते थोडेसे जखमी झाले. सदरील सुटका केलेल्या वेठबिगारांची विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड व न्या वाहाब सय्यद सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड भेट घेऊन त्यांची माहिती जाणून घेतली त्यांना मनमाड येथून एका एजंट ने खोटे बोलून बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील एका गावात कामासाठी आणले व एजंट ने पैसे घेऊन निघून गेला त्यांना दोन-तीन हजार रुपये फक्त दिले व एजंट ने ३० ते ४० हजार रुपये त्यांच्या नावावर घेऊन त्यांना त्या गोशाळेत कामासाठी ठेवून निघून गेला तरी या सर्व प्रकरणाची चौकशी वडवणी पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत सदरील कामगारांची जिल्हा शासकीय रुग्णालयातून सुट्टी झाल्यानंतर त्यांना त्यांच्या घरी महसूल प्रशासनाच्या वतीने पाठवण्यात येणार आहे. कामगारांना सुटका करण्यासाठी विनायक दिवटे, देवयानी गिराम,मंगेश बुचडे,प्रशांत बिर्ले, सिद्धेश्वर वावळ आदींचे विशेष सहकार्य लाभले.

पान ६ वरुन...

### एलसीबीने पकडला बीड बसस्थानकात

श्री. व्यकंटराम आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अर्जुन यादव, विकास राठोड, पोलीस अंमलदार अश्पाक सय्यद, मनोज परजणे आणि चालक पोलीस हवालदार नितीन वडमारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्थानिक गुन्हे शाखेच्या या धडक कारवाईबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### बीडमध्ये कुंटणखान्यावर पोलिसांचा

सचिन विष्णू धांडे (वय ३७, रा. कबाड गल्ली, बीड)शारदुल दिलीपराव देशपांडे (रा. जवाहर कॉलनी, बीड) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत प्रकाश पांढरे, शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सपोनि जनाबाई सांगळे व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ करत आहेत.

### सकल मराठा समाजाच्या वतीने

रास्ता रोको आंदोलन करण्यात आल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. शहरातील प्रमुख मार्गांवर मोठी गर्दी झाल्याने पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

आंदोलनकर्त्यांनी सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहावे, अशी भूमिका मांडली. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी माजलगाव परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. बंद व आंदोलनाच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलनाचा समारोप

मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचला. येथे आंदोलनाचा समारोप करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी मराठा समाजाच्या मागण्यांसाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाकडून बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने तोडगा काढून आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. आता सरकार या आंदोलनाची किती गांभीर्याने दखल घेते आणि पुढील भूमिका काय घेते, याकडे माजलगावसह मराठा समाजाचे लक्ष लागले आहे.

### बिंदुसरा नदीचा गळा

जाऊन मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होण्याची भीती वर्तवली जात आहे.

उद्या पूर आल्यास आणि शहर संकटात सापडल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा परखड सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने आता तरी कुंभकर्णी झोपेतून जागे होऊन नदीपात्रातील अतिक्रमणे तात्काळ हटवावीत आणि जबाबदार घटकांवर कडक कारवाई करावी, हीच बीडकरांची मागणी आहे.

### मराठा आरक्षणाच्या मागणीला

वर्दळ कमी होती. मात्र, आंदोलनाला पाठिंबा देताना नागरिकांनी संयम आणि शांतता कायम ठेवली. बंदच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.

सकल मराठा समाजाच्या आवाहनाला आष्टीकरांनी दिलेला प्रतिसाद म्हणजे आरक्षणाच्या प्रश्नाबाबत समाजाच्या मनातील तीव्र भावना आणि एकजुटीचे स्पष्ट दर्शन असल्याचे मानले जात आहे. व्यापाऱ्यांनीही कोणताही दबाव न आणता शांततेत बंद पाळत आंदोलनकर्त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शविला.

शांततेत बंद, मात्र मागणी ठाम!

आष्टी शहरातील या कडकडीत बंदमधून मराठा आरक्षणाच्या मागणीबाबतचा जनभावनेचा बुलंद आवाज प्रशासन आणि शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न झाला. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत व्यापारी आणि नागरिकांनी दाखविलेली शिस्त ही आंदोलनाच्या शांततामय स्वरूपाला अधोरेखित करणारी ठरली. आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत संघर्षाची धार कायम ठेवण्याचा निर्धार या भावनेतून आष्टीकरांनी बंदला दिलेला प्रतिसाद आजच्या आंदोलनाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.

## शरद तळेकर यांना हेलन केलर ज्ञानसंपदा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवागौरव पुरस्कार जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयात गेल्या २४ वर्षांपासून विशेष शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शरद चंद्रकांत तळेकर यांना दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल हेलन केलर ज्ञानसंपदा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवागौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



शरद तळेकर हे गेल्या २४ वर्षांपासून विशेष शिक्षक म्हणून कार्यरत असून, आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सर्वांगीण विकासासाठी विशेष योगदान दिले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन व आधार देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रामाणिकपणे कार्य केले आहे. विद्यार्थ्यांप्रती असलेली संवेदनशीलता, सेवाभाव आणि समर्पणाची भावना यामुळे त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. हा पुरस्कार सोहळा शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता हॉटेल निलकमल, तहसील कार्यालयासमोर, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्यास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितेन रहमान, जिल्हा दिव्यांग अधिकारी प्रियाराणी पाटील, समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, संतोष मानूरकर, वसंत मुंडे, सतीश पत्की, अंकुश नखाते आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवागौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल छत्रपती शाहू महाराज अपंग पुनर्वसन संस्थेचे अध्यक्ष सुखदेव पोकळे, सचिव भास्कर भवर, मुख्याध्यापक विजय झांजे, मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे, प्राचार्य बाळासाहेब राख तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, उत्तम बोडके, दत्ता काकडे, विनोद ढोबळे, भीमराव गुरव, प्रवीण पोकळे, रघुनाथ कर्डिले, शरद रेडेकर, मनोज पोकळे, सचिन रानडे, गणेश दळवी आदींनीही शरद तळेकर यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## सीसीआयकडून सिंदफणा महिला शेतकरी उत्पादक कंपनीला कॉटन थ्रेडर मशीन

**तालखेड येथील कंपनीला आधुनिक यंत्राचे वितरण; कापूस उत्पादक शेतकऱ्यांना होणार तंत्रज्ञानाचा लाभ**

माजलगाव । प्रतिनिधी

भारत सरकारच्या अधिपत्याखालील भारतीय कापूस महामंडळाच्या (सीसीआय) छत्रपती संभाजीनगर मुख्यालयाच्या वतीने माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत तालखेड येथील सिंदफणा महिला शेतकरी उत्पादक कंपनीला कॉटन थ्रेडर मशीन प्रदान करण्यात आले. या आधुनिक यंत्रामुळे कंपनीशी जोडलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा लाभ मिळणार असून, कापूस उत्पादन व प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.



या कार्यक्रमास सीसीआयचे असिस्टंट मॅनेजर वर्मा सर, धीरज कुमार, गणेश चव्हाण व हर्ष सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री. जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वीरेंद्र भैय्या सोळंके, वडवणी बाजार समितीचे सभापती संभाजी तात्या शिंदे, संचालक प्रभाकर आप्पा होके पाटील, अमोल राव जाधव, आसारामजी घायतिडक, नंदकिशोर सजगणे, कालू भाई पठाण, टवानी शेठ, जलाल शेठ, प्रशांत होके, सचिव हरिभाऊ सवणे, सहसचिव रवींद्र नाईकनवरे तसेच कापूस विभाग प्रमुख सुनील सवणे यांच्यासह शेतकरी उत्पादक कंपनीचे पदाधिकारी व कापूस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. महिला शेतकरी उत्पादक कंपनीला आधुनिक यंत्र उपलब्ध झाल्यामुळे कापूस प्रक्रियेला चालना मिळणार असून, शेतकऱ्यांना उत्पादनाच्या माध्यमातून अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने सीसीआयचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## प्रचंड क्रयशक्ती असलेल्या युवावर्गाची व्यसनधिनातेमुळे अपरिमित हानी - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

व्यसनाधीनता हा समाजाला लागलेला शाप असून व्यसनाधीनतेमुळे केवळ व्यसनी व्यक्तीचेच नाही तर त्याच्यासोबत त्याच्या कुटुंबीयांची समाजाची आणि राष्ट्राचे अपरिमित नुकसान होते असे वक्तव्य सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. नशामुक्त महाराष्ट्र अभियाना अंतर्गत पोलीस प्रशासन बीड च्या वतीने आयोजित नशामुक्त समाज या अंमली पदार्थ विरोधी जनजागर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

एमआयटी इंग्लिश स्कूल नागझरी परिसर या भागात झालेल्या या व्यसनमुक्ती जनजागर कार्यक्रमात विचारमंचावर अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपाधीक्षक ऋषिकेश शिंदे व अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती.




पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी बाल वयातील संस्कार हे महत्वाचे असतात. यां वयात मुलं निरीक्षनाने आकलन करत असतात आणी त्यांची बुद्धी परिपक्वतेपेक्षा भावनिकतेवर काम करत असते. या वयात मुलांना योग्य मार्गदर्शन आणी संस्कार मिळाल्यास त्यांना आपोआप चांगली नैतिक मूल्य आत्मसात करता येतात. नैतिक संस्काराशिवाय नैतिक अधिष्ठान असलेला नैतिक समाज निर्माण होऊ शकत नाही आणि जोपर्यंत नैतिक समाज निर्माण होत नाही तोपर्यंत ते राष्ट्र महासत्ता बनवू शकत नाही आणि त्यामुळे सर्व महापुरुषांनी समाज हा व्यसनमुक्त असावा आणि विज्ञानवादी असावा या विचारांचा आग्रह धरला होता. सर्व प्रकारची व्यसनी हे निश्चितपणे सुटू शकतात त्यासाठी व्यसनाधीन माणसाची स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती व सुरुवातीच्या काळात योग्य माणूस उपचार तज्ज्ञाचे व समोपदेशकाचे औषधोपचार व समुपदेशन आवश्यक असते असेही डॉ.इंगोले यांनी यावेळी सांगितले. सर्वप्रथम समाजात व्यसनमुक्ती व्हावी म्हणून जनप्रबोधन कार्यक्रम ठेवल्याबद्दल समाजातील जबाबदार नागरिक व्यसनमुक्ती तज्ज्ञ म्हणून बीड पोलीस प्रशासनाचे कौतुक करीत त्यांनी असेच समाज उपयोगी कार्यक्रम येणाऱ्या काळात ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बोलताना उप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी व्यापक जनजागृती आणि अमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. टप्प्याटप्प्याने यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे व्यसनमुक्ती जनप्रबोधन धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे अशी माहिती सांगितली. पोलीस उपाधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी व्यसनमुक्ती ही काळाची गरज आहे. व्यसनाधीनतेमुळे अनेक संसार देशोधडीला लागल्याचे सांगितले.

नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबविणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. पालकांनी आपल्या मुलांवर काळजीपूर्वक लक्ष द्यावे, त्यांचे मित्र, वर्तन याकडे विशेषत्वाने ध्यान देणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून सन २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यां उद्दिष्टाच्या अनुषंगाने शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांमध्ये आणि पालकांमध्ये व्यसनाधीनतेविषयी जागरूकता वाढवावी हा हेतू ठेवून हा कार्यक्रम ठेवण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमआयटी इंग्लिश स्कूलचे विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले.

# पुरंदर विमानतळासाठी संमती न मिळालेल्या जमिनींचे सक्तीने भूसपादन,शेतकऱ्यांना आता हे लाभ मिळणार नाहीत

पुणे / प्रतिनिधी


पुरंदर तालुक्यात प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनातील उर्वरित सुमारे ४० हेक्टर जमीन आता सक्तीने संपादित केली जाणार आहे. संमतीने जमीन संपादन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने संबंधित खातेदारांना अनेकदा मुदतवाढ दिली होती. मात्र, मुदतीत प्रतिसाद न दिल्याने या जमिनीचे कायद्यानुसार सक्तीने संपादन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

पुरंदरविमानतळासाठी या तालुक्यातील वनपुरी, कुंभारवळण, उदाचीवाडी, एखतपूर, पारगाव, मुंजवडी आणि खानवडी सात गावांमधील सुमारे १,२१६ हेक्टर जमीन संपादित करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी ९६ टक्के शेतकऱ्यांनी संमतीने भूसंपादनाला प्रतिसाद दिला असून, सुमारे ६० टक्के शेतकऱ्यांना मोबदलाही वितरित करण्यात आला आहे. मात्र, उर्वरित क्षेत्रातील ४० हेक्टर अर्थात ४ टक्के खातेदारांनी प्रशासनाच्या आवाहनानंतरही संमती



दिलेली नाही. संमतीने जमीन देणाऱ्या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांसाठी आर्थिक मोबदल्याबरोबरच संपादित जमिनीच्या बदल्यात दहा टक्के विकसित भूखंड देण्याची तरतूद करण्यात आली आहे. रस्ते, वीज, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था आणि पदपथ अशा पायाभूत सुविधांनी युक्त विकसित भूखंड देण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. मात्र, वारंवार संधी देऊनही संमती न देणाऱ्या शेतकऱ्यांची उर्वरित ४० हेक्टर जमीन आता सक्तीने संपादित केली जाणार आहे. त्यामुळे संबंधित जमीनमालकांना संमतीने भूसंपादनासाठी लागू असलेला दहा टक्के विकसित भूखंडाचा लाभ मिळणार नाही, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सक्तीच्या संपादनामध्ये संबंधितांना नियमानुसार मोबदला दिला जाणार आहे. प्रशासनाने यापूर्वी संमतीपत्रे सादर करण्यासाठी अनेकदा मुदतवाढ दिली होती. अखेरची संधी देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने विमानतळाच्या कामाला विलंब होऊ नये, यासाठी सक्तीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. यासंबंधीची पुढील प्रशासकीय आणि कायदेशीर कार्यवाही लवकरच सुरू होणार आहे. संमतीने जमीन संपादन करून देणाऱ्या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना ठरलेला आर्थिक मोबदला आणि दहा टक्के विकसित भूखंडाचा लाभ मिळणार आहे. मात्र, सक्तीने जमीन संपादित होणाऱ्या खातेदारांना विकसित भूखंडाचा लाभमिळणार नसल्याने संमती न देणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसणार आहे.

# अर्का निकिता - लागवडीस अनुकूल, संकरित भेंडीची वैशिष्ट्यपूर्ण जात!



अर्का निकिता -आधारित भेंडीचा पहिला संकरित वाण आहे जो भारत आणि जगातील सार्वजनिक संस्थांनी विकसित केला आहे. ही भेंडीची संकरित जात २०१७ मध्ये संस्थेने शोधून प्रसारित केलेली आहे.लवकर फुलधारणा होणाऱ्या या जातीत फुले येण्यासाठी ३९ दिवस आणि फळे येण्यासाठी ४३ दिवस लागतात. या जातीची फळे गडद हिरवी, मध्यम, गुळगुळीत आणि कोवळी असतात. या जातीत पौष्टिकदृष्ट्या जास्त अँटिऑक्सिडेंट आणि उच्च दर्ज्याचे फायबर (८.८५%) असतात. यात पोटॅशियम ३.७%, कॅल्शियम ९९७ /१०० ग्रॅम सारखे खनिजे आहेत. ही जात १२५-१३० दिवसांच्या कालावधीत तोडणीला तयार होत असून उत्पादन २१-२४ टन मिळते. अर्का निकिता ही भेंडीची जात उच्च उत्पादकता आणि शेतीसाठी अनुकूलता यासाठी ओळखली जाते. पारंपारिक शेती पद्धतींसह आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड याद्वारे या जातीचे लक्षणीय उत्पादन घेता येते. अर्का निकिता ही भेंडीची जात तिच्यातील अपवादात्मक गुणधर्मांसाठी ओळखली जाते जसे, उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हंगामात आणि प्रदेशांमध्ये लागवडीस अनुकूलता.

अर्का निकीता भेंडीची प्रमुख वैशिष्ट्ये : उच्च उत्पादन - अर्का निकिता प्रति हेक्टर २१-२४ टन इतके प्रभावी उत्पादन देते. या उच्च उत्पादकतेमुळे शेतकर्यांसाठी जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी एक चांगली निवड ठरते. फळांची गुणवत्ता - या संकरीत भेंडीची फळे गडद हिरवी, गुळगुळीत पाच कडच्यांची असतात. यामुळे ही भेंडी दिसायला आकर्षक तर आहेच शिवाय काढणीस सोपी आहे. कोवळी फळे यामुळे या जातीला बाजारभाव सुद्धा चांगला मिळतो. अनुकूलता - अर्का निकिता विविध प्रकारच्या परिस्थितीत लागवडीसाठी योग्य आहे. या जातीची खरीप (पावसाळा) आणि रब्बी (हिवाळा) दोन्ही हंगामात लागवड करता येते. ही जात कर्नाटक, आंध्र प्रदेश, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, हरियाणा, महाराष्ट्र आणि अंदमान आणि निकोबार बेटांसह संपूर्ण भारतातील प्रमुख भेंडी-उत्पादक प्रदेशांसाठी अनुकूल आहे. रोग सहनशील - ही संकरित जात भेंडी पिकातील हानिकारक यलो व्हेन मोझॅक व्हायरस या रोगास सहनशील आहे. त्यामुळे पिकाच्या उत्पादनात वाढ होऊन दर्जा सुद्धा वाढतो.

# आडसाली उसाचे एकात्मिक खत व्यवस्थापन

उसाच्या वाढीमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतात अन्नद्रव्ये. जमिनीमध्ये सेंद्रिय कर्ब, नत्र, स्फुरद, पालाश यासहित सूक्ष्मअन्नद्रव्यांचा संतुलित प्रमाणात असणे उसाच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी महत्त्वाचे असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी सेंद्रिय खते, रासायनिक खते आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर तज्ज्ञांनी शिफारस केलेल्या प्रमाणात करावा.

सेंद्रिय खते : सेंद्रिय कर्ब हा जमिनीच्या सुपीकतेचा मुख्य आधार असतो. जमिनीची पाणी धरुन ठेवण्याची क्षमता वाढवणे, माती भुसभुशीत ठेवणे, उपयुक्त सूक्ष्मजीवांची वाढ करणे, अन्नद्रव्यांची उपलब्धता आणि कार्यक्षमता वाढवण्यामध्ये सेंद्रिय पदार्थाची महत्त्वाची भूमिका असते. आडसाली ऊस लागवडीपूर्वी प्रति एकर किमान १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा ५ टन कंपोस्ट खत वापरावे. उपलब्धतेनुसार २ टन गांडूळ खत, २ टन कुजलेली प्रेसमड किंवा २ टन कोंबडी खताचाही वापर करता येतो. यासोबत ट्रायकोडर्मा, अॅझोटोबॅक्टर, पीएसबी आणि केएमबी यासारखी जैविक खते सेंद्रिय खतामध्ये मिसळून वापरल्यास मातीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढते आणि अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर होतो.

आडसाली उसामध्ये खत व्यवस्थापन : आडसाली उसासाठी खत व्यवस्थापन करताना माती परीक्षण करुनच खत मात्रा देणे फायदेशीर ठरते. तरी रासायनिक खते देण्याचे तीन पर्याय आहेत. सरळ खतांमध्ये युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट आणि म्युरेट ऑफ पोटॅश ही खते दिली जातात. तर मिश्र खतांमध्ये १०:२६:२६ आणि १९:१९:१९ यांचा वापर केला जातो. रासायनिक खतांमधून नत्र देताना लागणीवेळी १० टक्के, बाळबांधणीवेळी ४० टक्के, ९० दिवसांनी १० टक्के तर मोठी टक्के द्यावे. याशिवाय स्फुरद आणि पालाश देताना अर्धे लागणीच्या वेळी आणि अर्धे मोठी बांधणी करताना द्यावे.पर्याय १- सरळ खते : लागणीच्या वेळी युरिया १ पोते ४.५ पोते सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३ पोते म्युरेट ऑफ पोटॅश प्रति एकर द्यावे. यानंतर बाळबांधणी करताना २.५ पोते युरिया द्यावे आणि लागणीनंतर ९० दिवसांनी १ पोते युरिया द्यावा. तर मोठी बांधणी करताना ३ पोते युरिया , ४.५ पोते सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३ पोते म्युरेट ऑफ पोटॅश प्रति एकर द्यावे.



# रब्बी सूर्यफूल लागवड तंत्रज्ञान

दिवसेंदिवस खाद्यतेलाची मागणी वाढत आहे. जागतिक पातळीवर सोयाबीन, मोहरी, भुईमूग या पिकानंतर सूर्यफूल हे चौथ्या क्रमांकाचे तेलबिया पिक आहे. या पिकाची लागवड खरीप तसेच रब्बी हंगमातही केली जाते. आपल्या देशात कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश ही प्रमुख सूर्यफूल उत्पादक राज्ये आहेत. महाराष्ट्रातील बरेच शेतकरी या पिकाच्या लागवडीकडे वळत आहेत.

सूर्यफूल लागवडीसाठी पूर्वमशागत व लागवडीचा हंगाम :पेरणीआधी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या आडव्या-उभ्या पाळ्या द्याव्यात. कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. बियाणे ५ सें.मी. पेक्षा जास्त खोल पेरू नये. बागायती सूर्यफुलाची लागवड सरी-वरंब्यावर टोकन पद्धतीने करावी. मध्यम ते खोल जमिनीत अंतर ४५ ३० सें.मी. तर भारी जमिनीत ६० ३० सें.मी. ठेवावे. रब्बी हंगामात कोरडवाहू सूर्यफुलाची पेरणी १५ ऑक्टोबर पूर्वी करावी. तसेच बागायती सूर्यफुलाची पेरणी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करावी. सूर्यफूल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पीक घेऊ नये.

बीजप्रक्रिया व पिकाचे वाण :पेरणीसाठी सुधारित बियाणांचे वाण ८ ते १० कि.ग्रॅ. तर संकरित बियाणे ५ ते ६ कि.ग्रॅ. प्रति हेक्टरी वापरावे. मर रोगाच्या प्रतिबंधासाठी प्रतिकिलो



बियाणास २ ते २.५ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी.

सुधारीत वाण :एस.एस. ५६ : कमी कालावधीत येणारे हे वाण असून अवर्षणग्रस्त भागात या वाणाची लागवड करावी. हे वाण ८० ते ८५ दिवसांत तयार होते. या वाणापासून सरासरी प्रति हेक्टरी ९ ते १० क्विंटल उत्पादन मिळते. मॉडर्न : हे वाण उशिरा पेरणीसाठी योग्य असून पिकाची उंची कमी असते. सरासरी प्रतिहेक्टरी ७ ते ८ क्विंटल इतके उत्पादन मिळते. भानू : हे सूर्यफुलाचे वाण कोणत्याही हंगामात घेता येते. हे वाण ८५ ते ९० दिवसांत तयार होते. प्रतिहेक्टरी १२ ते १३ क्विंटल उत्पादन मिळते.

संकरित वाण :के.बी.एस.एच. १ : या वाणामध्ये तेलाचे प्रमाण व उत्पादनक्षमता अधिक आहे. ८५ ते ९० दिवसांत तयार होते. १२ ते १४ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. एल.एस.एच-३५ : अधिक उत्पादनक्षमता, केवडा रोगास प्रतिकारक हे वाण आहे. ९० ते ९५ दिवसात तयार होते. प्रति हेक्टरी १८ ते २० क्विंटल उत्पादन मिळते. एल.एस.एफ.एच १७१ : या वाणाची लागवड कोरडवाहू तसेच बागायतीसाठी करता येते. सूर्यफुलाची आंतरपीक म्हणून लागवड करायची असल्यास तूर आणि भुईमूग या पिकामध्ये करावी.

खत व्यवस्थापन :जमिनीची पूर्वमशागत करताना लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी २.५ टन शेणखत टाकावे. कोरडवाहू पिकासाठी माती परीक्षणानुसार हेक्टरी ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद व २५ किलो पालाश हे खत वेळी दोन चाड्याच्या पाभरीने पेरणीच्या वेळी द्यावे. बागायती पिकासाठी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद, ३० किलो पालाश द्यावे. यापैकी पेरणीच्या वेळी ३० किलो द्यावे. व पेरणीनंतर १ महिन्याने उर्वरित ३० किलो नत्र द्यावे. मशागत व पाणी व्यवस्थापन :पेरणीनंतर १५ दिवसांनी सूर्यफुलाची विरळणी करावी. दोन रोपांतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. आवश्यकतेनुसार एक ते दोन खुरपण्या कराव्या. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी एक आणि ३५ ते ४० दिवसांनी एक अशा दोन कोळपण्या कराव्यात. पिकाची रोपावस्था, फुलकळी, फुलोरा व दाणे भरताना अशा वाढीच्या अवस्थांमध्ये पिकाला पाणी द्यावे.

कृत्रिम परागीभवन : पिकामध्ये दाणे भरण्यासाठी फुलाचे परागीभवन होणे आवश्यक असते. कृत्रिम परागीभवन करण्यासाठी हाताच्या पंजाला तलम कापड गुंडाळून सकाळी ६ ते ११ या वेळेत दर दिवसाआड तीन ते चार वेळा पिकावरून हळूवार हात फिरवावा. मधमाश्यांच्या चार ते पाच पेट्या एक हेक्टर पिकात ठेवाव्यात.




## महत्वाच्या घटना

१८८२ : थॉमस एडिसन यांनी इतिहासातील पहिल्या व्यावसायिक विद्युत ऊर्जा प्रकल्प चालु केले वीजयुगाची सुरुवात म्हणून हा दिवस ओळखला जातो.
१८८८ : जॉर्ज इस्टमन याने 'कोडॅक' हा ट्रेडमार्क नोंदवला व फिल्म कॅमेर्याचे पेटंट घेतले.
१९०९ : लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या स्काऊटचा पहिला मेळावा झाला.
१९३७ : व्हेनिसमधील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'प्रभात'च्या 'संत तुकाराम' या चित्रपटाची जगातल्या तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट म्हणून निवड झाली. इतर दोन चित्रपट होते ऑस्ट्रेलियाचा 'फ्लाइंग डॉक्टर' आणि हंगेरीचा 'मारिया नोव्हेर'.
१९०९ : बालवीर चळवळीचा पहिला मेळावा झाला. लॉर्ड बेडन पॉवेल यांनी सुरू केलेली ही चळवळ थोड्याच काळात जगभर पसरुन लोकप्रिय झाली.
१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी 'गुगल'ची स्थापना केली.
१९७२ : मार्क स्पिटझ हा एकाच ऑलिम्पक स्पर्धेत ७ सुवर्णपदके मिळवणारा पहिला खेळाडू बनला.
१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी गुगलची स्थापना केली.
२००१ : या कंपनीने संगणक क्षेत्रातील ही बलाढ्य कंपनी २५ अब्ज डॉलर्सला विकत घेतली.
२०१२ : लंडनमध्ये मध्ये झालेल्या पॅरालंपिक स्पर्धेत भारतीय पॅरालंपिक खेळाडू गिरीशने उंच उडी क्रीडा प्रकारात भारताला पहिले पदक मिळवून दिले.
२०१३ : रघुराम राजन यांनी 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'चे २३ वे गव्हर्नर म्हणुन पदभार हाती घेतला.
२०१८ : युवा भारतीय बॅडमिंटनपटू अनुष्का पारीख आणि सौरभ शर्मा यांनी युक्रेनच्या खारकिव्ह येथे खारकिव्ह आंतरराष्ट्रीय चॅलेंजच्या मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२१ : श्री चक्रधर स्वामी महानुभाव पंथाचे संस्थापक (मृत्यू: ७ फेब्रुवारी १२७४)
१८२५ : पितामह दादाभाई नौरोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक आणि राजकीय व सामाजिक नेते, ब्रिटिश संसदेचे सदस्यत्त्व मिळवणारे पहिले भारतीय (मृत्यू: ३० जून १९१७)
१८८० : भारतीय स्वातंत्र संग्रामातील प्रसिद्ध क्रांतिकारक तसचं, प्रख्यात समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ भूपेंद्रनाथ दत्त यांचा जन्मदिन.
१८९५ : प्रसिद्ध भारतीय हिंदी लेखक व राष्ट्रकवि मैथिलीशरण गुप्त यांचे छोटे भाऊ सियाराम शरण गुप्त यांचा जन्मदिन.
१९०१ : जॅग्वोर कार चे सहसंस्थापक विल्यम लियन्स जॅग्वोर यांचा जन्म. (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९८५)
१९०५ : मिनॉक्स चे शोधक वॉल्टर झाप यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै २००३)
१९१३ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९९८)
१९२३ : भारतीय वकील आणि राजकारणी राम किशोर शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २००३)
१९३७ : शंकर सारडा साहित्यिक व समीक्षक. सारडा यांनी ६० हून अधिक पुस्तकं लिहिली असून, दोन हजारांहून अधिक पुस्तकांचं समीक्षण केलं आहे. (मृत्यू: २८ जानेवारी २०२१)
१९४१ : सुशीलकुमार शिंदे प्रसिद्ध भारतीय राजकारणी व भारतीय महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तसचं, माजी केंद्रीय गृहमंत्री
१९५२ : ऋषी कपूर सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते
१९६२ : किरण मोरे भारतीय क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू आणि यष्टीरक्षक तसचं, बीसीसीआय निवड समितीचे माजी अध्यक्ष
१९६४ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर २०१५)
१९७१ : लान्स क्लूसनर दक्षिण अफ्रिकेचा अष्टपैलू क्रिकेटपटू

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१२ : भारतेंदु कालीन अग्रगण्य साहित्यिकांपैकी एक सुप्रसिद्ध साहित्यकार मोहनलाल विष्णू पंड्या यांचे निधन.
१९९७ : डॉ. धर्मवीर भारती हिन्दी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार व 'धर्मयुग' साप्ताहिकाचे २७ वर्षे संपादक, 'अभ्युदय' व 'संगम' या नियतकालिकांचे संपादनही त्यांनी केले. (जन्म: २५ डिसेंबर १९२६)
२००० : मोहम्मद उमर 'मुक्री' आपल्या अभिनयाद्वारे पाच दशके खळाळून हसवणारे विनोदी कलाकार व चरित्र अभिनेते (जन्म: ५ जानेवारी १९२२)
२०१२ : भारतीय लेखक सय्यद मुस्तफा सिराज यांचे निधन. (जन्म: १३ ऑक्टोबर १९३०)
२०१२ : भारतीय गायक-गीतकार हांक सूफी यांचे निधन. (जन्म: ३ मार्च १९५२)
२०१५ : भारतीय सर्जन आणि राजकारणी विल्फ्रेड डी डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १९२७)







# मुंगूसवाडे ग्रामपंचायत प्रशासकीय कालखंड ग्रामनिधीच्या व्यवहारांवर गंभीर प्रश्नचिन्ह ?

## २ लाख ३२ हजार ८०० रु गैरव्यवहार झाल्याचा संशय !;उच्चस्तरीय चौकशी विशेष लेखापरीक्षण रक्कम ;वसुली व दोषींवर कायदेशीर कारवाईची मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मुंगूसवाडेच्या ग्रामपंचायत अंतर्गत प्रशासकीय कालखंड सन २०२०-२१ मधील ग्रामनिधीच्या आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत ग्रामपंचायतीच्या उपलब्ध नोंदीतील तीन व्यवहारांमध्ये एकूण ₹२ लाख ३२ हजार ८०० रुपयांची रक्कम दाखविण्यात आली असून या व्यवहारांची सखोल चौकशी व विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की मुंगूसवाडे ग्रामपंचायत मधील संशयास्पद ठरलेले तीन व्यवहार पुढील प्रमाणे १) व्हाउचर क्र./२०२०-२१//१० दि : २७/०८/२०२० रक्कम (₹१,०६,३००/- ) शेरा राहणीमान भत्ता २) व्हाउचर क्र. २०२०-२१//११ दि : २७/०८/२०२० रक्कम : (₹४२,८००/-) नाव : राम गुलाब चव्हाते शेरा : राहणीमान भत्ता ३) व्हाउचर क्र / २०२१-२२//६ दि. १३/०६/२०२१ रक्कम : (₹८३,७००/-) यांच्या नावे रामनाथ नवनाथ खेडकर पाणीपुरवठा कर्मचारी या तीनही व्यवहारांची एकूण रक्कम ₹२,३२,८००/- इतकी आहे रक्कम नेमकी कोणाच्या खात्यावर वर्ग झाली ? या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे व्हाउचरमध्ये दाखविलेली रक्कम प्रत्यक्षात कोणाच्या बँक खात्यावर वर्ग झाली संबंधित रक्कम कोणत्या माध्यमातून अदा करण्यात आली त्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव प्रशासकीय मंजुरी अधिकृत आदेश बिल पावती व इतर आवश्यक कागदपत्रे उपलब्ध आहेत का याची तपासणी होणे आवश्यक आहे त्यासाठी कॅशबुक लेजर बँक स्टेटमेंट धनादेश अथवा ऑनलाइन पेमेंटची नोंद संबंधित व्हाउचर बिल-पावत्या ग्रामपंचायत ठराव व मंजुरी आदेश यांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे विशेष लेखापरीक्षणाची मागणी उपसरपंच गयाबाई सखाराम खेडकर यांनी या प्रकरणाची केवळ प्राथमिक चौकशी न करता उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी व विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी केली आहे चौकशीत आर्थिक अनियमितता किंवा ग्रामनिधीचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाल्यास नियमानुसार संपूर्ण रक्कम वसूल करून संबंधित जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे तसेच चौकशीत खोटी नोंद बनावट कागदपत्रे निधीचा गैरवापर अधिकाराचा गैरवापर संगनमत किंवा अन्य कोणतेही फौजदारी स्वरूपाचे कृत्य आढळल्यास लागू कायद्यानुसार संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात यावी अशीही मागणी आहे ग्रामनिधी हा जनतेचा पैसा असल्याने तो गावच्या विकास कामासाठी खर्च न करता गैरव्यवहार करताना सरकारी व प्रशासकीय नियम धाब्यावर बसवून ग्राम निधीचा पैशावर डल्ला मारल्याच संशय असल्याने त्यातील प्रत्येक रुपयाचा हिशोब पारदर्शकपणे जनतेसमोर आला पाहिजे संबंधित व्यवहारांची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य समोर यावे अनियमितता आढळल्यास रक्कम वसूल करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी या संदर्भात गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडे चौकशी व विशेष लेखापरीक्षणाची मागणी करण्यात आली आहे आता प्रशासन या प्रकरणाची चौकशी कधी सुरू करते विशेष लेखापरीक्षण होते का आणि चौकशीत नेमके काय निष्पन्न होते याकडे मुंगूसवाडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## || थोडक्यात



### पंचायत समितीत रविकिरण पाटील यांना अभिवादन

शिरूर अनंतपाळ। प्रतिनिधी

येरोळ येथील पत्रकार कै. रविकिरण वसंतराव पाटील यांचे बुधवारी दुःखद निधन झाले आहे. सामाजिक,राजकीय,क्रीडा, ग्रंथालय तसेच पत्रकारिता क्षेत्रात त्यांनी मोलाची भूमिका बजावली होती.त्यामुळे त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी गुरूवारी पंचायत समिती सभागृहात सभापती संजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पत्रकार संघाच्या वतीने शोकसभा घेण्यात आली. या शोकसभेत त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सभापती संजय सूर्यवंशी,सहाय्यक गटविकास अधिकारी रवींद्र साचणे, पंचायत विस्तार अधिकारी दिनकर व्होट्टे,शिक्षण विस्तार अधिकारी अनिल पागे, तुकाराम लांडगे, राहुल शिरुरे,. प्रा . डॉ. पांडुरंग मुठ्ठे, प्रा .डॉ बालाजी हालसे,पत्रकार शकील देशमुख, मेहताब शेख, सुधाकर सूर्यवंशी, फतेअलीखान पठाण, मल्हारी शिंदे, राजकुमार काळे यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन राजकुमार काळे यानी केले आभार रमेश मुळे यांनी मानले .

### कृष्णा शाम येडले पाटील माध्यमिक शिक्षकपदी निवड

लातूर। प्रतिनिधी



कृष्णा पाटील यांची मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर पुणे महानगर पालीका येथे इयत्ता ९ वी ते १० वीच्या माध्यमिक शिक्षक पदासाठी निवड झाल्याबद्दल. कृष्णा शाम येडले पाटील यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि कर्तृत्वाचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना मिळणार असून, त्यांच्या उज्ज्वल भवितव्याला आकार देण्याची ही अत्यंत अभिमानास्पद संधी आहे.*ही निवड शासनाच्या पवित्र पोर्टल द्वारे करण्यात आली आहे आपल्या पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस येडले व मित्र परिवारातून कृष्णा शाम येडले यांचे अभिनंदन केले जात आहे

# तांड्यातील रोहितची ‘नीट’ भरारी; डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार!

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ५१५ गुणांची कमाई; रत्नागिरीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश

नळगीर। प्रतिनिधी

जिद्द, चिकाटी आणि प्रचंड मेहनतीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत नळगीरजवळील ब्राह्मणवाडी तांडा येथील रोहित दिलीप पवार या बंजारा समाजातील विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेत ५१५ गुण मिळवत रोहितने वैद्यकीय शिक्षणासाठी पात्रता मिळविली असून, त्याला रत्नागिरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे. त्याच्या या यशामुळे कुटुंबीयांसह नळगीर व परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



रोहित हा अत्यंत सामान्य व आर्थिकदृष्ट्या प्रतिकूल परिस्थिती असलेल्या कुटुंबातील मुलगा आहे. त्याचे वडील दिलीप नामदेव पवार हे शेतमजुरी तसेच गुरेढोरे राखण्याचे काम करतात. आई सविता दिलीप पवार यांनी मुलाच्या शिक्षणासाठी मोलाची साथ दिली. आर्थिक अडचणी आणि प्रतिकूल परिस्थिती समोर असतानाही रोहितने शिक्षणाची वाट सोडली नाही. ध्येय निश्चित करून त्याने सातत्याने अभ्यास करत आपल्या स्वप्नाकडे वाटचाल केली.रोहितचे पहिली ते तिसरीपर्यंतचे शिक्षण जय हिंद पब्लिक स्कूल, उदगीर येथे झाले. त्यानंतर चौथी ते दहावीपर्यंतचे शिक्षण विद्यावर्धिनी हायस्कूल, उदगीर येथे पूर्ण केले. बारावीचे शिक्षण त्याने देवणी येथे पूर्ण केले. त्यानंतर लातूर येथील विद्या आराधना क्लासेसमध्ये मार्गदर्शन घेत त्याने नीट परीक्षेची तयारी केली.शांत, संयमी आणि कष्टाळू स्वभावाच्या रोहितने सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश मिळविले. त्याला ओ. एस. किवंडे गुरुजी, गंगाधर बोळेगावे गुरुजी, सुगावे गुरुजी आणि श्याम पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांची साथ यामुळे वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने रोहितने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत रोहितने मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. त्याच्या यशाबद्दल नळगीर व परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तांड्यातील विद्यार्थ्यांसाठी रोहितची यशोगाथा निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर ध्येय गाठता येते, हे रोहितने आपल्या यशातून दाखवून दिले आहे.

# डॉ. झाकेर हुसेन प्राथमिक शाळेची चौकशी करा

मंठा । प्रतिनिधी

येथील डॉ. झाकेर हुसेन प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांची चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी पालकांच्या वतीने मंठा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी पालकांनी शाळेतील विविध समस्यांकडे गटशिक्षणाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. निवेदनात नमूद केल्यानुसार, शाळेच्या वेळेत शिक्षक उपस्थित राहत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या बाहेर उभे राहण्याची वेळ येत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी अधिकृत शिक्षक वेळेवर उपलब्ध नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे. मुख्याध्यापक वेळेवर शाळेत उपस्थित राहत नसल्याने तसेच काही शिक्षकही वेळेवर येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा दावा पालकांनी केला आहे.

या शाळेत जवळपास ३५० विद्यार्थी शिक्षण घेत असून, शाळेतील नियोजनाचा अभाव आणि शिक्षकांच्या कथित अकार्यक्षमतेमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवित्यावर परिणाम होत असल्याची चिंता पालकांनी व्यक्त केली आहे. शाळेचे वेळापत्रकानुसार नियमित अध्यापन केले जाते की नाही, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शाळेत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व इतर उपक्रमांची माहिती पालकांना वेळेवर दिली जाते का, याची तपासणी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. सर्व वर्गांच्या हजेरी नोंदी, मासिक व त्रैमासिक उपस्थितीचे रेकॉर्ड तपासण्यात यावे, तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराचे रेकॉर्ड व प्रत्यक्ष अंमलबजावणी यांचीही तपासणी करून योग्य ती कार्यवाही करावी, असे निवेदनात नमूद आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून तीन दिवसांच्या आत संबंधितांवर कारवाई करावी, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही पालकांनी दिला आहे. या निवेदनावर सय्यद एजाज अली, खालेद खान पठाण, ऊबेद बागवान, रियाज शेख, सय्यद आजमत अली, रहिम शेख, मोईन शेख, मुक्तदिर बागवान, शेख अजमत अजीज, शेख सलीम राज, शेख मुख्तार आदी पालकांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

जालना : येथील कु. भूमी विकी पवार हिने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याची चमक दाखवत १७ व्या कुडो राज्यस्तरीय व ७ व्या मेयर्स कप स्पर्धेत दोन रौप्यपदकांची कमाई केली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जालना येथील ८८८ फाउंडेशन च्या अध्यक्षा. कल्याणी ताई तौर यांनी भूमी विकी पवार हिचे विशेष कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



# लातूरसह जिल्हाभरात बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद



लातूर । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी आज लातूर बंदचे आवाहन करण्यात आले होते. लातूर शहरात हा बंद कडकडीत स्वरूपात करण्यात आला. आडत बाजारसह शाळा, महाविद्यालये, प्रमुख आस्थापना बंद ठेवण्यात आले होते.लातूर शहरातून सकल मराठा समाज कार्यकर्त्यांनी रॅली काढून बंदचे आवाहन केले.

कालच बहुतांश शाळा, महाविद्यालयाने ३ सप्टेंबर रोजी बंद असल्याच्या सूचना विद्यार्थ्यांना दिल्या होत्या. लातूर शहराप्रमाणे औसा, निलंगा, रेणापूर, उदगीर, अहमदपूर, चाकूर आदी ठिकाणीही बंद पाळण्यात आला. आज पहाटे दीड वाजता लातूर-बार्शी रोडवर साखरा पाटी येथे रस्त्यात टायर जाळून काही काळ आंदोलन करण्यात आले होते. तर आज औसा तहसील कार्यालय परिसरात असलेल्या जलकुंभावर चढून कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. एकूणच आज लातूर शहरासह जिल्हाभरात सकल मराठा समाजाच्या लातूर बंद आंदोलनाला चांगला प्रतिसाद मिळाला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवली सराटी येथे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसले असून, त्यांच्या या लढ्याला राज्यभरातून मोठा पाठिंबा मिळत आहे. याच पाश्वभूमीवर 'सकल मराठा समाज, लातूर यांच्या वतीने पुकारण्यात आलेल्या लातूर बंदला १०० टक्के प्रतिसाद मिळाला असून संपूर्ण शहर व परिसर कडकडीत बंद राहिला. सकाळपासूनच शहरातील सर्व मुख्य बाजारपेठा, किराणा दुकाने, सराफा गल्ली, भाजी मंडई, कापड दुकाने, खासगी आस्थापने, कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट यार्ड) आणि चहाच्या टपऱ्या पूर्णपणे बंद होत्या. स्थानिक व्यापारी महासंघ आणि नागरिकांनी या बंदला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला.

**CHATRAPATI URBAN NIDHI LIMITED**
REGD OFF: 618/2, Chaklamba Tal- Georai, Bid, Beed, Maharashtra, India, 431127.
CIN: U74995MH2017PLC299008
Email: chatrapatiurbanmh23@gmail.com | Contact No: +91 9422842223

**Public Notice**

**(Pursuant to section 20 read with Section 96 and section101of the Companies Act, 2013)**

**NOTICE** is hereby given that the 9th Annual General Meeting of Members of **CHATRAPATI URBAN NIDHI LIMITED** will be held on **Wednesday, the 30th day of September, 2026 at 11:00 AM** at the registered office of the company situated at 618/2, Chaklamba Tal- Georai, Bid, Beed, Maharashtra, India, 431127 to transact the following business:

**ORDINARY BUSINESS:** 1. To consider and adopt the Financial Statements and Board Report with annexure for 31/03/2026.

2. To consider retirement by rotation of Director and re-appointment thereof.

**SPECIAL BUSINESS: To consider and if thought fit to pass the following resolutions**

4. To consider and approve the increase in Authorized share capital of the Company.

5. To consider and approve Director's remuneration.

A copy of notice along with the explanatory statement is affixed on the notice Board of the Company. The same can be delivered to the member on request and payment of fees. In case of any queries, members may contact registered office of the Company.

**BY ORDER OF THE BOARD OF DIRECTORS**
**FOR CHATRAPATI URBAN NIDHI LIMITED**
SD/-
ROSHAN CHHAJED
DIRECTOR
DIN: 08011364
PLACE: BEED

**NOTES:**

A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and the proxy need not be a member of the company.

Proxies in order to be effective must be lodged with the company at its registered office at least 48 hours before the time appointed for the meeting

# नळगीर-गुत्ती पाणंद रस्त्याच्या निकृष्ट कामावर ग्रामस्थ संतप्त

## दोन दिवसांत रस्ता दुरुस्त करण्याची मागणी; अन्यथा बेमुदत उपोषणाचा इशारा

नळगीर । प्रतिनिधी

मातोश्री पाणंद रस्ता योजनेंतर्गत करण्यात आलेल्या नळगीर-गुत्ती पाणंद रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी केला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच रस्त्याची दुरवस्था झाली असून, पावसामुळे रस्ता चिखलमय झाल्याने शेतकरी, महिला आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या संदर्भात ग्रामस्थांच्या वतीने दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, नळगीर येथील ग्रामसेवकांना निवेदन देण्यात आले आहे. रस्त्याची तात्काळ पाहणी करून निकृष्ट कामाची चौकशी करावी आणि रस्ता योग्य दर्जाने दुरुस्त करून वाहतुकीसाठी पूर्ववत करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.





नळगीर-गुत्ती पाणंद रस्त्यालगत अनेक शेतकऱ्यांची शेती असून, शेतीमालाची वाहतूक, दैनंदिन ये-जा तसेच आपत्कालीन परिस्थितीत या रस्त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे पावसाळ्यात तो चिखलमय झाल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली आहे.जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांचा दर्जा योग्य असणे आवश्यक आहे. विकासकामाच्या नावाखाली जनतेच्या पैशांचा अपव्यय आणि शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा सहन केल्या जाणार नाहीत, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. निवेदनात रस्त्याचे काम येत्या काही दिवसांत व्यवस्थित करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

अन्यथा ग्रामस्थ व शेतकरी बांधवांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, सदर रस्त्याच्या कामाची गुणवत्ता, खर्च, अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीची चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. रस्ता दुरुस्त करा; अन्यथा आंदोलन अटळ!'' असा इशारा देत ग्रामस्थांनी प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष वेधले आहे.

# गुऱ्हाळाला ४३००, मग कारखानदार शेतकऱ्यांना किती देणार?

## ऊसदर जाहीर करा, थकीत बिले द्या;अन्यथा शिवसेना रस्त्यावर मडके

गेवराई । प्रतिनिधी

गुऱ्हाळ मालक ऊसाला ₹४३०० प्रति टन दर देत असतील, तर साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या उसाला किती दर देणार, हे तातडीने जाहीर करावे. शेतकऱ्यांच्या उसावर कारखाने चालवायचे आणि त्याच शेतकऱ्याला दर व पेमेंटसाठी झगडायला लावायचे, हा प्रकार आता चालणार नाही, असा थेट इशारा शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव (बापू) मडके यांनी दिला.

गेवराई तालुक्यातील मोठ्या प्रमाणातील ऊस बाहेरील कारखान्यांकडे जातो. मात्र दर, पेमेंटला होणारा विलंब, काट्याबाबतच्या तक्रारी आणि शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत वारंवार प्रश्न निर्माण होत आहेत. प्रस्थापित व्यवस्थेने शेतकऱ्यांना विस्थापित करण्याची वेळ आणली असेल, तर आता त्या व्यवस्थेला शिवसेना जाब विचारणार, असे मडके यांनी स्पष्ट केले.



"हा शेतकऱ्यांचा कायदेशीर किमान हक्क आहे. त्यापेक्षा योग्य दर मिळवून देण्यासाठी आम्ही कारखानदारांशी थेट चर्चा करू. दर जाहीर न केल्यास आणि शेतकऱ्यांच्या हक्काचे पेमेंट वेळेत न केल्यास साखर आयुक्तांपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पाठपुरावा करू," असे त्यांनी सांगितले.

कारखानदारांना सात प्रश्न

कारखानदारांनी यावर्षी शेतकऱ्यांसमोर स्पष्टपणे सांगावे ऊसाचा दर किती? पेमेंट कधी? मागील थकबाकी किती? विलंबाचे व्याज कोण देणार? काट्याची पारदर्शकता कशी ठेवणार? रिकव्हरी किती? आणि शेतकऱ्याला अंतिम दर किती मिळणार?

या सर्व बाबींची माहिती घेऊन कारखानानिहाय ऊसदराचा तुलनात्मक अहवाल तयार करून साखर आयुक्त, जिल्हाधिकारी व राज्य शासनाकडे सादर केला जाईल, अशी माहिती मडके यांनी दिली.

"निवेदन देऊन थांबणारी शिवसेना नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही तर बैठका, मोर्चे, आंदोलन आणि रस्त्यावरचा संघर्षलोकशाही मार्गाने जे काही करावे लागेल ते करू. शेतकऱ्यांच्या घामाचा दर कमी करणाऱ्यांना आता शिवसेना जाब विचारणार," असा इशारा उद्धव (बापू) मडके यांनी दिला.

# तक्रार करताच महिला वाहकाने तरुण प्रवाशाच्या श्रीमुखात लगावली

## एनसीएमसी कार्डमुळे वाहक व प्रवाशामध्ये हुज्जत

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील बसस्थानकावर एका महिला वाहकाने प्रवासी व वाहक यांच्या भांडणात मध्ये पडलेल्या एका तरुणास सदर वाहक महिलांनी बेताल पणे चक्क तरुणाच्या कानाखाली लावल्याचा प्रकार घडला सदर प्रकरणी या तरुणाने बीड व छत्रपती संभाजी नगर विभाग नियंत्रकाकडे लेखी तक्रार दिली आहे सदर प्रकरणी माहिती अशी की छत्रपती संभाजी नगर तुळजापूर बस क्रमांक २९०६ महिला वाहक बॅच नंबर १७३ कर्तव्य करीत असताना दिनांक ०१/०९/२०२६ रोजी मांजरसुंबा येथे बस आली असता एक वृद्ध महिला व एक तरुण दोन्हीही बस मध्ये प्रवास करू लागले सदर महिला एनसीएमसी कार्ड बाबत माहिती नसल्याने गोंधळून गेली या वाहक महिलाने तिला समजून सांगण्याऐवजी गाडीतून ढकलून देईल अशी सांगून तिला अर्वाच्य वागणूक दिली त्यावेळेस प्रवास करणारा दुसरा प्रवासी तरुण युवक उत्तरेश्वर अरुण आंधळे याने या वाहक महिलेस त्या वृद्ध महिलेस समजून सांगा असे म्हणत मध्यस्थी केली तेव्हा या वाहक महिले. ने त्याला पण अर्वाच्य बोलून गप्प केले तर बस चौसाळा येथे आली असता तक्रार करायला गेलेल्या तरुणाच्या मागे येऊन या महिलेने वाहतूक नियंत्रक कांबळे यांच्यासमोर त्याच्या तोंडात लगावली मारहाण झालेल्या तरुणाने छत्रपती संभाजी नगर व बीड या विभाग नियंत्रकाकडे तक्रार करून बेशिस्त महिला वाहकाविरुद्ध कारवाई करावी अशी मागणी त्याने केली आहे.

# एलसीबीने पकडला बीड बसस्थानकात चोऱ्या करणारा चोरटा

बीड । प्रतिनिधी

बीड येथील बसस्थानक परिसरात प्रवाशांचे खिसे कापणारा व चोऱ्या करणाऱ्या एका सराईत चोराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पेठ बीड भागातून शिताफीने ताब्यात घेतले. जालिंधर शेषेराव वाघमारे असे या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून रोख ९,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शिवाजीनगर व परळी संभाजीनगर पोलीस ठाण्यातील दोन गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा (गु.र.नं. २६८/२०२६) दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास शिवाजीनगर पोलीस ठाण्यासोबतच स्थानिक गुन्हे शाखा करत होती. तपास सुरू असतानाच स्थानिक गुन्हे



शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, हा गुन्हा बीड येथील जालिंधर शेषेराव वाघमारे याने केला असून तो सध्या पेठ बीड परिसरात फिरत आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तात्काळ सापळा रचून जालिंधर वाघमारे यास ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवत त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने शिवाजीनगर हद्दीतील बसस्थानकात चोरी केल्याची कबुली दिली. तसेच अधिक विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, त्याने संभाजीनगर पोलीस ठाणे (परळी) हद्दीतही अशाच प्रकारची चोरी केल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्याच्याकडून रोख ९,५०० रुपयांची रक्कम जप्त केली आहे. या कारवाईमुळे शिवाजीनगर ठाण्यातील गु.र.नं. २६८/२०२६ आणि संभाजीनगर (परळी) ठाण्यातील गु.र.नं. ५६/२०२६ असे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस अधीक्षक पान ३ वर

# बीडमध्ये कुंटणखान्यावर पोलिसांचा धडक छापा एका पीडित महिलेची सुटका, तिघांना अटक

बीड । प्रतिनिधी

शहरातील जवाहर कॉलनी परिसरात सुरू असलेल्या एका कुंटणखान्यावर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत छापा टाकला. या कारवाईत एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली असून तीन मुख्य आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जवाहर कॉलनी (चंपावती शाळेच्या मागे) येथील एका भाड्याच्या घरात बाहेरून महिला बोलावून वेश्याव्यवसाय चालवला जात असल्याची गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक



कक्षाला (-कक्षण) मिळाली होती. या माहितीच्या आधारे परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत प्रकाश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी पंचांसमक्ष डमी ग्राहक पाठवून सापळा रचला.

३५ हजारांचा मुद्देमाल जप्त

छाप्यादरम्यान पोलिसांनी डमी ग्राहकाने दिलेले ३ हजार रुपये रोख, १२ निरोध आणि महिलांची ने-आण करण्यासाठी वापरण्यात येणारी हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. MH-23 -K 5909) असा एकूण ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

चार जणांवर गुन्हा दाखल

हे ठिकाण शासकीय आयटीआयपासून १०० मीटर अंतराच्या आत असल्याने आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी विष्णू लक्ष्मण शिंदे (वय ४८, रा. माळीवेस, बीड) एक महिला (वय ६०, रा. कबाड गल्ली, बीड) व पान ३ वर

# सकल मराठा समाजाच्या वतीने माजलगाव कडकडीत बंद

## मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ मोर्चासह रास्ता रोको आंदोलन



माजलगाव । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ दि. ३ सप्टेंबर गुरुवार रोजी माजलगाव शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील व्यापारी, नागरिक,युवक तसेच विविध घटक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले. त्यामुळे शहरातील प्रमुख बाजारपेठा व व्यावसायिक आस्थापना दिवसभर मोठ्या प्रमाणात बंद राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले.सकाळपासूनच शहरात आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले होते. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आंदोलकांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. हातात विविध मागण्यांचे फलक घेतलेल्या आंदोलकांनी सरकारने तातडीने मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी केली.

यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.बस स्थानक परिसरातही मराठा आरक्षणाच्या मागणीसह सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर प्रमुख मार्गावरून मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान काही काळ पान ३ वर

# एलपीजी सिलिंडर रिफिलिंगची मर्यादा ३० दिवसांवर आणा

### खा.बजरंग सोनवणे यांची केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांना भेडसावणारी घरगुती एलपीजी सिलिंडरची टंचाई दूर करण्यासाठी रिफिलिंगचा कालावधी ४५ दिवसांवरून ३० दिवसांवर आणण्यात यावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.


पत्रात म्हटले आहे, सध्या लागू असलेल्या नियमांनुसार ग्राहकांना दुसरा सिलिंडर बुक करण्यासाठी ४५ दिवस वाट पाहावी लागते. मात्र, घरातील सदस्यांची संख्या आणि रोजची गरज यानुसार अनेक कुटुंबांचा सिलिंडर ४५ दिवस पूर्ण होण्याआधीच संपतो. परिणामी, पुढील बुकिंगची मुदत पूर्ण होईपर्यंत नागरिकांना सिलिंडरशिवाय प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. ४५ दिवसांची एकसमान मर्यादा सर्वच कुटुंबांसाठी व्यावहारिक नसल्याचे खासदार सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे. एलपीजी सिलिंडरच्या री-बुकिंगची आणि वितरणाची ४५ दिवसांची मर्यादा कमी करून ती ३० दिवस करण्यात यावी, यासंदर्भात पेट्रोलियम मंत्रालय, संबंधित अधिकारी व एलपीजी गॅस कंपन्यांना तातडीने निर्देश द्यावेत, या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील ग्राहकांना वेळेवर गॅस उपलब्ध होईल आणि त्यांची अडचण दूर होईल. जनहित लक्षात घेऊन या गंभीर समस्येवर त्वरित आणि सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

# बिंदुसरा नदीचा गळा घोटणारे भूमाफिया मोकाट; बीडच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह!

बीड । प्रतिनिधी

शहराची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या बिंदुसरा नदीचे अस्तित्व सध्या धोक्यात आले असून नदीपात्रात दिवसेंदिवस माती आणि मलब्याचा भराव टाकून पात्र संकुचित केले जात आहे. खुलेआम चाललेल्या या अतिक्रमणाकडे जिल्हा प्रशासन आणि नगरपालिकेने डोळेझाक केल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. बिंदुसरा वाचवा, बीड वाचवा अशी हाक आता नागरिक देत आहेत.

भूमाफियांचे अतिक्रमण आणि रेड झोनचे उल्लंघन जेसीबी



आणि पोकलेनच्या साहाय्याने नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर भराव टाकून नैसर्गिक प्रवाह अडवला जात आहे.

रेड झोनमध्ये अलिशान बंगले: पूररेषा आणि रेड झोनचे नियम धाब्यावर बसवून नदीच्या हद्दीतच पक्की बांधकामे आणि बंगले उभे राहिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपालिकेकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे भूमाफिया आणि अधिकाऱ्यांचे साटेलोटे असल्याचा थेट आरोप नागरिकांकडून केला जात आहे.संभाव्य धोके आणि नागरिकांची चिंताबीड शहराने यापूर्वीही महापुराचे भीषण वास्तव अनुभवले आहे. अशा स्थितीत जर भविष्यात अतिवृष्टी झाली, तर पाण्याचा निचरा होण्यासाठी मार्गच शिल्लक राहिलेला नाही. यामुळे नदीकाठच्या वस्त्या पाण्याखाली पान ३ वर

# मराठा आरक्षणाच्या मागणीला आष्टीचा बुलंद आवाज!

## जिल्हा बंदला आष्टी शहराचा १०० टक्के प्रतिसाद; अत्यावश्यक सेवा वगळता बाजारपेठ कडकडीत बंद






आष्टी । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी येथील आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी ३ सप्टेंबर रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने आज बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला आष्टी शहरात उत्स्फूर्त आणि शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. अत्यावश्यक सेवा वगळता शहरातील दुकाने, व्यापारी आस्थापने आणि संपूर्ण व्यापारपेठ दिवसभर कडकडीत बंद ठेवण्यात आली.

मराठा आरक्षणाचा प्रश्न हा समाजाच्या भवितव्याशी निगडित असल्याने बंदच्या आवाहनाला व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आपली भूमिका स्पष्ट केली. व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत आंदोलनाला शांततेच्या मार्गाने पाठिंबा दिला.

बंददरम्यान शहरातील प्रमुख बाजारपेठा ओस पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. रस्त्यांवर नेहमीची पान ३ वर

# पत्रकारांच्या एसटी सवलतीचा तिढा सुटला! पत्रकारांच्या एसटी सवलतीबाबत सिस्टीममध्ये तातडीने दुरुस्ती

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या तक्रारीची परिवहन मंत्र्यांकडून दखल; सवलत पूर्ववत करण्याचे आदेश

मुंबई । प्रतिनिधी

अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना एसटीच्या बसमधून मिळणारी १०० टक्के मोफत प्रवासाची सवलत एनसीएमसी (NCMC) कार्डच्या नव्या यंत्रणेत उपलब्ध होत नसल्याबाबत अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने केलेल्या तक्रारीची परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी तातडीने दखल घेतली असून, पत्रकारांची सवलत सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणेत आवश्यक दुरुस्ती करून सिस्टीम अपडेट करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार दुरुस्ती ही झाली असून सिस्टीम अपडेट झाली आहे. त्यामुळे राज्यभरातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

एनसीएमसी मशीनमध्ये पत्रकारांना लागू असलेली १०० टक्के मोफत प्रवासाची सवलत समाविष्ट नसल्याने पत्रकारांना पूर्ण तिकीट काढून प्रवास करावा लागत असल्याच्या तक्रारी राज्यभरातून परिषदेच्या पदाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या होत्या. नव्या यंत्रणेमुळे पत्रकार आणि एसटीचे चालक-वाहक यांच्यात वाद निर्माण होत असून, काही ठिकाणी हा वाद गंभीर स्वरूप धारण करत असल्याचे परिषदेने परिवहन मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

या पार्श्वभूमीवर परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवराज काटकर, मुंबई अध्यक्ष राजा आदाटे आणि मुंबई पत्रकार अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष दीपक कैतके यांनी गुरुवारी परिवहन मंत्र्यांच्या कार्यालयात निवेदन सादर केले. एनसीएमसी कार्ड व यंत्रणेतील तांत्रिक त्रुटी दूर करण्याबरोबरच पत्रकारांच्या १०० टक्के सवलतीचा रकाना सिस्टीममध्ये समाविष्ट करून ती अपडेट करावी, अशी मागणी करण्यात आली. ती मंत्र्यांनी ताबडतोब दुरुस्त करून घेतली आहे. त्याबद्दल परिषदेने मंत्र्यांचे आभार मानले आहेत.



सिस्टीम अपडेट होईपर्यंत पूर्वीच्या कार्डवरच अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना १०० टक्के मोफत प्रवासाची सवलत देण्याचे स्पष्ट आदेश राज्यातील सर्व आगार व्यवस्थापकांमार्फत चालक-वाहकांना देण्यात यावेत, अशीही मागणी करण्यात आली. तसेच या आदेशाची माहिती प्रत्येक चालक व वाहकाला झाली आहे याची खात्री करण्याची जबाबदारी आगारप्रमुखांवर सोपवावी, जेणेकरून पत्रकार आणि एसटी कर्मचाऱ्यांमधील अनावश्यक वाद टाळता येतील, असे निवेदनात नमूद करण्यात आले होते.

एसटीच्या स्लीपर कोच, पुणे-मुंबई-नाशिक मार्गावरील शिवनेरी तसेच इतर काही प्रीमियम सेवांमध्येही पत्रकारांना १०० टक्के सवलत मिळत नसल्याचा मुद्दा परिषदेने उपस्थित केला. एसटीच्या सर्व प्रकारच्या बससेवांमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना सवलत लागू करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, परिषदेच्या निवेदनाची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या कार्यालयाने तातडीने दखल घेतली. अधिस्वीकृतीधारक पत्रकारांची १०० टक्के प्रवास सवलत सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणेत आवश्यक दुरुस्ती व सिस्टीम अपडेट करण्याबाबत आदेश देण्यात आल्याचे कार्यालयाकडून कळविण्यात आले. त्यानुसार सिस्टीम मध्ये दुरुस्ती करण्यात आली आणि केलेली दुरुस्ती छायाचित्रासह परिषदेकडे पाठवण्यात आली आहे. परिषदेच्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न तातडीने मार्गी लागण्याची प्रक्रिया सुरू झाली याबद्दल परिवहन मंत्री महोदय आणि संबंधित यंत्रणेचे आम्ही आभार मानतो अशी माहिती शिवराज काटकर, राजा आदाटे आणि दीपक कैतके यांनी दिली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26